दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, दि.२ एप्रिल २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १६९ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम आज जिल्ह्याच्या दौऱ्यावर

वर्धा : महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड. धर्मपाल मेश्राम दि. २ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. दि. २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन सकाळी ११ ते १२ वाजता जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यासोबत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १२ ते १ वाजता मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांच्या सोबत आढावा विविध कामाची पाहणी, दुपारी १ ते २ मुख्याधिकारी नगर परिषद आर्वी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी २ ते २.३० राखीव दुपारी २.३० ते ३.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद देवळी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ३.३० ते ४.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद हिंगणघाट यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ४.३० ते सायंकाळी ५.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद सिंदी रेल्वे यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी करतील. त्यानंतर सोइनुसार नागपूर कडे प्रयाण करतील.

रिझर्व्ह बॅंक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ

डिजीटल व्यवहारांत देशाला जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआयचा महत्वाचा वाटा : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू





वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : भारत २०४७ मध्ये 'विकसित भारत' (Viksit Bharat 2047) होण्याच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक आहे. रिझर्व्ह बॅंक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ राहणार आहे. भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात रिझर्व्ह बॅंकऑफ इंडियाचा मोठा वाटा आहे. मजबूत बॅंकिंग प्रणाली, वित्तीय नवउपक्रम आणि ग्राहकांचा विश्वास कायम राखण्याच्या दृष्टीने याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमात राष्ट्रपती श्रीमती मुर्मू बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बॅंकेचे गर्व्हनर संजय मल्होत्रा उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनाचा उत्सव आज साजरा करत आहोत. रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया या प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर ही देशातील सर्वात महत्त्वाच्या संस्थांपैकी एक आहे. देशाची केंद्रीय बॅंक म्हणून रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया भारताच्या अद्वितीय विकास प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर स्थितीपासून ते आजच्या जागतिक महासत्तेपर्यंतच्या प्रवासात आरबीआय हा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. १९३५ मध्ये स्थापन झालेली ही संस्था नेहमीच देशाच्या विकासाच्या प्रवासापेक्षा एक पाऊल पुढे राहिली असून या प्रवासात देशाचे नेतृत्वही केले असल्याचे राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या.

आरबीआय केवळ केंद्रीय बॅंक नसून वित्तीय समावेशन व संस्थात्मक उभारणीमध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संस्थात्मक बांधणीच्या दृष्टिकोनातून आरबीआय ने नाबार्ड, आयडीबीआय, सिडबी आणि नॅशनल हाऊसिंग बॅंक यांसारख्या महत्त्वपूर्ण वित्तीय संस्था स्थापन केल्या आहेत, ज्या शेती, लघु व्यवसाय आणि गृहनिर्माण क्षेत्रासाठी महत्त्वाचा पाठिंबा देतात. 'लीड बॅंक योजना'सारख्या उपक्रमांमुळे बॅंकिंग सेवा ग्रामीण भागांपर्यंत पोहोचवण्यात मदत झाली आहे. आर्थिक समावेशनाच्या दिशेने आरबीआय ने प्रधानमंत्री जनधन योजनेसाठी अनुकूल धोरणात्मक वातावरण निर्माण केले आहे. विशेषतः, महिलांच्या मोठ्या संख्येने या योजनेत सहभागी होणे हा आर्थिक सक्षमीकरणाचा सकारात्मक बदल आहे.

डिजीटल व्यवहारांत देशाला जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात वाटा

भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआय चा मोठा वाटा आहे. युपीआय (ळझ्ह) सारख्या नाविन्यपूर्ण प्रणालींमुळे आर्थिक व्यवहार सहज, सुरक्षित आणि किफायतशीर झाले आहेत. याशिवाय, आरबीआय ने एक संपन्न वित्तीय-तंत्रज्ञान (इग्ह-ऊाम्) पर्यावरण निर्माण करण्यासही मदत केली आहे. जसे-जसे भारत तंत्रज्ञानाधारित वित्तीय व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे, तसे आरबीआय ग्राहक संरक्षण अधिक बळकट करत आहे आणि नव्या आव्हानांचा सामना करत आहे. आरबीआय ग्राहकांच्या विश्वासास प्राधान्य देत असून, ठेवीदारांसाठी विमा सुरक्षा, तसेच तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करत आहे. 'एकात्मिक लोकपाल योजना' (घ्ह्रीू ध्स्र्ल्ल्ह्ल एम्पस) द्वारे ग्राहकांना तक्रार निवारणाची सुलभ आणि पारदर्शक सुविधा मिळत आहे.

वित्तीय साक्षरता ही ग्राहक संरक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. आरबीआयच्या विविध मोहिमा आणि प्रकाशने नागरिकांना वित्तीय व्यवहारांतील जोखीम समजावून सांगतात, फसवणुकीपासून वाचण्यास मदत करतात आणि सुज्ञ आर्थिक निर्णय घेण्यास प्रोत्साहन देतात. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीसोबतच सायबर सुरक्षेच्या जोखमीही वाढत आहेत. त्यामुळे आरबीआय डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठी सक्रिय पावले उचलत आहे. आरबीआय पर्यावरण पूरक धोरणांच्या दिशेने पावले उचलत आहे. हरित (ग्रीन) अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करताना आरबीआयने 'ग्रीन डिपॉझिट फ्रेमवर्क' आणि 'प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा' (झ्रेदेपूह एाप्दे थह्ग्हु - झ्रथ्ह) अंतर्गत हरित वित्तपुरवठा यासारख्या उपक्रमांद्वारे मोठे योगदान दिले आहे. आरबीआयने काळानुसार स्वतःला विकसित करत भारताच्या आर्थिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महागाई नियंत्रण, वित्तीय समावेशन, आर्थिक स्थैर्य आणि मजबूत वाढ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये त्याची भूमिका निर्णायक ठरली आहे.

गेल्या ९० वर्षांत आरबीआयचा प्रवास सरकारच्या दृष्टीकोन आणि धोरणांशी सुसंगत राहिला आहे. आर्थिक सुधारणांपासून स्थिरतेपर्यंत, सरकार आणि आरबीआय यांचे सहकार्य देशाच्या आर्थिक वाढीसाठी उपयुक्त ठरले आहे. केवळ एका स्वाक्षरीने आरबीआयच्या गव्हर्नरच्या स्वाक्षरीने एक साधे कागदाचे तुकडे चलन बनते. ही ताकद दुसऱ्या कोणाच्याही स्वाक्षरीला नाही. सर्वसामान्य नागरिकांना आरबीआय सोबत थेट संपर्क नसतो, परंतु त्यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये आरबीआयचा अप्रत्यक्षपणे प्रभाव असतो. गेल्या नव्या दशकांत आरबीआयने कमावलेली सर्वात मोठी संपत्ती म्हणजे जनतेचा विश्वास. हा विश्वास कायम राखण्यासाठी आरबीआयने नेहमीच स्थिरता, आर्थिक प्रगती आणि वित्तीय सुरक्षेच्या उद्दिष्टांवर भर दिला आहे. १९९० च्या आर्थिक उदारीकरणापासून कोविड-१९ महामारीपर्यंत आरबीआयने वेगवान आणि प्रभावी उपाययोजना केल्या आहेत. तसेच, जागतिकीकरणाच्या काळातही देशाच्या वित्तीय व्यवस्थेची सुसूत्रता कायम राखली असल्याचे सांगून राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी रिझर्व्ह बॅंक व्यवस्थापनाचे अभिनंदन केले.

यावेळी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी रिझर्व्ह बॅंकेच्या योगदानाचे महत्व अधोरेखित करत जागतिक स्तरावर होत गेलेल्या गतीमान बदलांच्या पार्श्वभूमीवरही आरबीआयने आर्थिक बाबी नियंत्रित करण्यात ठामपणे बजावलेल्या कामगिरीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष स्टॅम्पचे अनावरण ही करण्यात आले.

भोसला सैनिके शाळेमुळे सैन्यदलाला उत्कृष्ट अधिकारी, देशासाठी शिस्तप्रिय नागरिक घडविण्याचे कार्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



संस्थापक डॉ. बाळाकृष्ण मुंजे यांच्या पुतळ्याचे अनावरण; जनरल बिपीन रावत सभागृहाचे लोकार्पण

वृत्तसंस्था ■ नागपूर

नागपूर : भोसला सैनिकी शाळेच्या माध्यमातून देशाच्या सैन्यदलासाठी उत्कृष्ट अधिकारी तसेच आधुनिकतेला स्विकारणारे व शिस्तप्रिय नागरिक घडविण्याचे काम होत असल्याचे गौरोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

भोसला सैनिकी शाळेच्या परिसरात संस्थेचे संस्थापक डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे व जनरल बिपीन रावत यांच्या स्मृति प्रीत्यर्थ बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक सभागृहाचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास सेवानिवृत्त जनरल मनोज पांडे, हवाई दलाचे सेवानिवृत्त एयर चिफ मार्शल शिरीष देव उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर सेंट्रल हिंदू मिलिट्री एज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुर्यरतन डागा, भोसला सैनिकी शाळेचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर, संस्थेचे कुमार काळे, दिलीप चव्हाण, राहूल दिक्षीत, हेमंत देशपांडे, विवेक रानडे, संजय जोशी, अमरेंद्र हरदास आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समाजामध्ये सैनिकी मुल्यांचे रोपण व सैन्याचे भारतीयीकरण तसेच त्यांच्यामध्ये लढण्याची क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने भोसला सैनिकी शाळेची स्थापना झाली. आधुनिकतेला स्वीकारणारी पिढी निर्माण करण्याचे काम संस?थेच्या माध्यमातून होत आहे. अनुशासित भारत घडविण्याच्या कार्यासोबतच सैन्यदलाला आधुनिकतेकडे घेवून जाणारे सैन्यदल प्रमुख मेजर जनरल बिपीन रावत यांच्या स्मृती कायम राहाव्यात व त्यांच्या कार्याची युवकांना प्रेरणा मिळावी. संपूर्ण भारतीयांना मेजर बिपीन रावत यांच्या कार्याची व आदर्शांची कायम आठवण रहावी, विद्यार्थ्यांमध्ये जिद्द निर्माण व्हावी यासाठी अत्याधुनिक सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे. आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीने देशाची वाटचाल सुरू असून जगातील सर्वात आधुनिक शस्त्र देशात तयार होत आहेत व आपण या शस्त्रांची निर्यातही करत आहोत. भारताने नेहमी शांतीसाठी कार्य केले असल्यामुळे बलशाली भारतच जगाला शांतीचा संदेश देवू शकतो असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. एयर मार्शल शिरीष देव यांनी भोसला सैनिकी शाळा ही एनडीए च्या धर्तीवर विकसित होत असल्याचे सांगितले. महाराष्ट्रात सैनिकी शाळांच्या शिक्षणाचा दर्जा तसेच सैनिकी शिक्षणाबाबत प्रशासनाकडून विशेष लक्ष पुरविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी सैन्य दल प्रमुख मनोज पांडे म्हणाले, जनरल बिपीन रावत हे देशासाठी अलौकीक कार्य करणारे व विकसित

भारतामध्ये सशस्त्र दलाला आधुनिकतेकडे नेणारे दूरदर्शी नेतृत्व होते. तिन्ही दलाला एकत्र करून त्यांच्यामध्ये समन्वय ठेवण्यासोबतच युद्धासाठी कायम सज्जता असावी अशा विचारांचे असल्यामुळे भारतीय सैन्य दलात त्यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात बदल झाले असल्याचे गौरोद्गार यावेळी त्यांनी काढले.

भोसला सैनिकी शाळेचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर यांनी स्वागत करून संस्थेमध्ये जनरल बिपीन रावत यांच्या स्मृती कायम राहाव्यात व त्यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी अत्याधुनिक अशा सभागृहाची निर्मिती करण्यात आली असल्याचे सांगितले. सैनिकी शिक्षणाची सुरूवात करणारे संस्थेचे संस्थापक डॉ. बाळाकृष्ण मुंजे यांच्या पुतळ्याचे अनावरण ही संस्थेसाठी महत्वपूर्ण घटना असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रख्यात शिल्पकार प्रदिप शिंदे यांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हर्षला राजगिरे यांनी केले. तर राहूल दीक्षीत यांनी आभार मानले. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व योजनेतून तयार करण्यात आलेल्या विकासकामांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

शिव तांडव स्तोत्र पठण कार्यक्रमातून आध्यात्मिक वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



वृत्तसंस्था ■ नागपूर

नागपूर : शिव तांडव स्तोत्र हे शिवातील चांगल्या गुणांची स्तुती आहे. चांगल्या गुणांची स्तुती ही सकारात्मक ऊर्जा देण्यासह मनोबल उंचावण्याचे काम करते. जिथे कुठे अहंकारासारखी स्थिती निदर्शनास येते त्या अहंकाराला दूर करण्याचे मार्ग आध्यात्मात मिळतात. शिवतांडव स्तोत्राच्या अशा पठणासारख्या कार्यक्रमातून आपण सकारात्मक ऊर्जा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

कामठीतील श्री महादेव घाट परिसरात आज शिव तांडव स्तोत्र पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार परिणय फुके, माजी आमदार टेकचंद सावरकर, राजे मुधोजी भोसले आदी यावेळी उपस्थित होते.

अतिशय सुंदर असा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याबद्दल कामठीतील शिवराज्य प्रतिष्ठानचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांच्या स्वसंरक्षणार्थ विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासोबतच शिव तांडव स्तोत्र पठण यासारख्या कार्यक्रमाच्या आयोजनातून आपला आध्यात्मिक वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. शिव तांडव स्तोत्र पठण या अनोख्या उपक्रमाबद्दल कौतुकोदगार काढले तसेच येत्या काळातही अशा प्रकारचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

निसर्ग उन्नत मार्गावर पर्यटकांची झुंबड, सर्व स्लॉट हाऊसफुल्ल

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर लोकार्पण झालेल्या मलबार हिल परिसरातील 'निसर्ग उन्नत मार्ग' मुंबईकरांच्या पसंतीस उतरत आहे. त्यानंतर मुंबईकरांनी या मार्गाला भेट देऊन निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवला. ३१ मार्च रोजी सार्वजनिक सुटीच्या निमित्ताने ऑनलाईन तिकिटाचे सर्व स्लॉट हाऊसफुल्ल झाले. तसेच येत्या आठवडाभराच्या कालावधीसाठीही नागरिकांनी आगाऊ तिकिट नोंदणी केली आहे. अवघ्या दोन दिवसात तीन हजारांहून अधिक पर्यटकांनी निसर्ग उद्यान मार्गाला भेट दिली.

सिंगापूर येथील 'ट्री टॉप वॉक'च्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने सुमारे ३० कोटी रुपये खर्चून निसर्ग उन्नत मार्ग विकसित केला आहे. या मार्गाचे लोकार्पण कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते रविवारी पार पडल्यानंतर मार्ग पर्यटकांसाठी खुला करण्यात आला. पहिल्या दिवशी म्हणजेच ३० मार्च रोजी १ हजार ५३ मुंबईकरांनी या मार्गाला भेट दिली. या तिकिट नोंदणीतून महापालिकेच्या तिजोरीत २६ हजार ९२५ रुपये इतका महसूल जमा झाला. तर ३१ मार्च रोजी २ हजार ३४६ पर्यटकांनी या स्थळाला भेट दिली. यातून ६० हजार ३०० रूपयांचा महसूल प्राप्त झाला. तसेच आठवड्याच्या अखेरसाठीही मोठ्या प्रमाणात आगाऊ तिकिट नोंदणी होत आहे.

शेकडो झाडांमधून मार्गिका विकसित करताना निसर्गाला कोणत्याही प्रकारची हानी न पोहचवता हा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. दररोज पहाटे ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा मार्ग खुला राहणार आहे. या ठिकाणी मुंबईच्या समृद्ध जैवविविधतेचे दर्शन घडवणाऱ्या १०० हून अधिक वनस्पतींसह झाडे, निरनिराळे पक्षी, सरपटणारे प्राणी न्याहाळताना एका ठिकाणावरून गिरगांव चौपटीचेही विहंगम दृश्य पाहण्याचीही संधी पर्यटकांना मिळत आहे. तसेच, पर्यटकांना पूर्वपरवानगीशिवाय चित्रीकरण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश

निसर्ग उन्नत मार्गाच्या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांसाठी सोयी-सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करावी. सुरक्षेच्या दृष्टीने काटेकोरपणे नियोजन करावे, असे आदेश महानगरपालिका आयुक्त तसेच प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच पर्यावरणदृष्ट्या नियमित स्वच्छतेसाठी प्राधान्य देण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. मुंबईत पर्यटकांसाठी हा एक आदर्श प्रकल्प ठरणार आहे, त्यामुळे या ठिकाणी परिरक्षणाच्या अनुषंगाने विशेष काळजी घेण्याच्याही सूचना गगराणी यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

ऑनलाईन तिकिट नोंदणीची सुविधा

निसर्ग उन्नत मार्गाला भेट देण्यासाठी https://naturetrail.mcgm.gov.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाईन तिकीट काढण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. भारतीय नागरिकांसाठी २५ रुपये, तर परदेशी नागरिकांना १०० रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात येणार आहे. हा मार्ग पाहण्यासाठी प्रत्येकी एका तासाचा कालावधी (स्लॉट) आहे. तसेच ऑनलाईन तिकिट नोंदणीतून प्राप्त झालेल्या बारकोडच्या सहाय्यानेच पर्यटकांना या मार्गावर प्रवेश मिळणार आहे.

नागपुरात साकारणारे स्पोर्टस हब, आयुक्त कार्यालयासह इतर इमारती ग्रीन बिल्डींगच्या आदर्श वस्तुपाठ ठराव्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

विविध बांधकाम प्रकल्पांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्री बावनकुळे यांच्या समवेत भेट देऊन केली पाहणी

वृत्तसंस्था ■ नागपूर



नागपूर : नव्याने उभारण्यात येत असलेल्या क्रीडा संकुलातील स्पोर्टस हब, विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाचे बारा मजली असलेले ट्वीन टॉवर्स हे केवळ बांधकामातील गुणवत्तेच्या दृष्टीनेच नव्हे तर सौर ऊर्जेच्या वापरासह ग्रीन बिल्डींग म्हणून नावारुपास आले पाहिजेत. यादृष्टीने इमारतीच्या बांधकामातील प्रत्येक टप्यांवर याचा विचार करुन काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात साकारणारे स्पोर्टस् हब व जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उभारल्या जाणाऱ्या बारा मजली ट्वीन टॉवर्स आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या बांधकामाची आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या समवेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता दिनेश नंदनवार, अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, कार्यकारी अभियंता अभिजीत कुचेवार, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, उपविभागीय अभियंता प्रशांत शंकरपूरे व इतर विभाग प्रमुख उपस्थित होते.

नागपूर येथील लॉ विद्यापीठातील इमारतीच्या रचनेत आपण ऊर्जेबाबत स्वयंपूर्णता अंगिकारली. शाश्वत विकास व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून विचार करता क्रीडा संकुल व आयुक्तालयाचे हे बांधकाम हे नेटझिरो अर्थात ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण असले पाहिजे. या संकुलाला कार्यालयाला जी वीज लागेल ती वीज सौर ऊर्जेच्या माध्यमातून आपण भागविण्यावर भर दिला पाहिजे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या सर्व इमारती ग्रीन बिल्डींगच्या सर्व मानकांची पुर्तता करुन पाण्याच्या पुर्नवापराच्या दृष्टीने आदर्श मापदंड ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सर्व इमारतींच्या उभारणीसाठी जो कालावधी निश्चित केला आहे त्या कालावधीच्या आत कोणत्याही परिस्थितीत बांधकाम पूर्ण झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

पतीला घराचे हप्ते भरावेच लागतील, कौटुंबिक हिंसाचाराच्या दाव्यात न्यायालयाचा आदेश

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : 'पती, पत्नीच्या नावावर घर असेल. पती सुरुवातीपासून हप्ते भरत असेल, काही कारणांमुळे दोघे जण वेगळे राहत असतील, तरी पतीला घराचे हप्ते भरावेच लागतील,' असा आदेश न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचाराच्या दाव्यात दिला. 'पत्नीला बेघर करता येणार नाही, तसेच तिची जबाबदारी पतीला घ्यावी लागेल,' असाही आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी कौटुंबिक हिंसाचाराच्या दाव्यात दिला. 'पतीने थकवलेले गृहकर्जाचे हप्ते भरावेत आणि यापुढील काळात नियमित हप्ता भरावा लागेल,' असे न्यायालयाने दिलेल्या आदेशात नमूद केले आहे.

अंजली आणि आशुतोष (नावे बदलली आहेत) हे दोघे संगणक अभियंता आहेत. दोघे माहिती-तंत्रज्ञान कंपनीत कामाला आहेत. विवाह झाल्यानंतर दोघांनी गृह खरेदीचा निर्णय घेतला. गृहकर्जाचे हप्ते आशुतोषने भरायचे असे त्यांच्यात ठरले. सुरुवातीला त्याने नियमित हप्ते भरले. त्यानंतर त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. मतभेद झाल्याने आशुतोष घर सोडून निघून गेला. घर सोडल्यानंतर त्याने हप्ते भरणे बंद केले. हप्ते न भरल्याने बँकेकडून नोटीस बजाविण्यात आली. अंजली यांना हप्ते भरणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी त्यांचे वकील ॲड. प्रतीक दाते आणि ॲड. धनंजय जोशी यांच्यामार्फत न्यायालयात दाद मागितली.

'पतीपेक्षा पत्नीचे उत्पन्न कमी असल्याने ती गृहकर्जाचे हप्ते भरू शकणार नाही. ती बेघर होईल. तिला राहण्याचा हक्क मिळायला हवा. पतीच्या जीवनशैली आणि दर्जानुसार पत्नीला राहण्याचा हक्क कौटुंबिक हिंसाचार कायद्याने पत्नीला दिला आहे. पती तिला घराबाहेर काढू शकत नाही,' असा युक्तिवाद ॲड. दाते आणि ॲड. जोशी यांनी केला. त्यांनी न्यायालयासमोर संतोष नाईक विरुद्ध सौभाग्या (केरळ) या निकालाचा संदर्भ दिला. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी युक्तिवाद ग्राह्य धरून आदेश दिला. ती घरात राहत नसला तरी घराचे हप्ते भरणे ही त्याची जबाबदारी आहे, असे आम्ही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायालयाने पत्नीला राहण्याचा हक्क दिला, तसेच पतीने घराचे हप्ते भरायला पाहिजे, असे आदेश दिले. या निकालामुळे दावा दाखल करणाऱ्या महिलेला दिलासा मिळाला आहे, असे ॲड. धनंजय जोशी आणि ॲड. प्रतीक दाते यांनी सांगितले.

संपादकीय...

राजेशाही म्हणावी आयुली...

लोकशाहीचे मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या अमेरिकेतच लोकशाहीच्या चिंध्या होत असतील तर नेपाळसारख्या देशांस लोकशाही आश्वासक कशी वाटेल, हा प्रश्न. जगातील अनेक देशांत लोकशाही हवी या मागणीसाठी आंदोलन करणारे नागरिक पाहणे नवीन नाही. पण नेपाळचे पाऊल मात्र उफराटे. या देशात आंदोलन सुरू आहे ते मोडीत निघालेली राजेशाही पुन्हा प्रस्थापित केली जावी या मागणीसाठी. त्या देशातील राजेशाही संपुष्टात आली त्यास दीड दशकाहून अधिक काळ लोटला. या काळात डझनांनी सरकार-बदल झाले. कारण राजकीय स्थैर्य नाही. एकदा डावे सत्तेवर येतात. नेपाळ कम्युनिस्ट पार्टी, त्याच बाजूचे माओवादी हे नेपाळमध्ये सरकार बनवतात. पण त्यांचे काही चालत नाही. ते सरकार जाते. मग नेपाळ काँग्रेस पक्ष, राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी वगैरेंचे सरकार येते. त्यांचीही तीच बोंब. सरकार म्हणजे जणू खोखोचा खेळ. तेही टिकत नाहीत. यामुळे नेपाळी जनता त्रस्त झाली असून हा पोरखेळ आता पुरे असे अनेकांस वाटू लागले आहे. अशा वातावरणात त्या देशातील राजघराण्याच्या प्रतिनिधीने फेब्रुवारी महिन्यात मोर्चा काढला आणि राजकीय अस्थिरतेविरोधात आवाज उठवता उठवता जनतेस आपल्यामागे येण्याचे आवाहन केले. जनता खरोखरच आली. त्यामुळे तेव्हापासून पुन्हा एकदा राजेशाहीच हवी अशी मागणी जोर धरू लागली आणि आता तर त्या मागणीसाठीच्या आंदोलनास हिंसक वळण लागले. निदर्शकांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले, जाळपोळीच्या घटना घडल्या आणि राजकीय कार्यालयांवर हल्लेही झाले. त्यानंतर पंतप्रधान के. पी. ओली यांनी नागरिकांस शांततेचे आवाहन केले आणि वर कारवाईचा इशाराही दिला. तथापि त्याने काही फरक पडेल असे वाटत नाही. नागरिकांतील ही अस्वस्थता नेपाळपुरती मर्यादित नाही. आपल्या आसपासच्या देशांवर नजर टाकल्यास कमी-अधिक प्रमाणात हीच परिस्थिती सर्वत्र दिसेल. तेव्हा यानिमित्ताने या परिस्थितीमागील कारणांवर भाष्य करता करता 'गड्या आपुला राजाच बरा' असे नागरिकांस का वाटू लागते याचा शोध घेणे आवश्यक. बांगलादेश, पाकिस्तान, काही प्रमाणात श्रीलंका, म्यानमार अशा आपल्या शेजारी देशांतील अस्वस्थता आणि नेपाळातील परिस्थिती यामागील कारणे फार भिन्न नाहीत. या सर्व देशांत कोणत्या ना कोणत्या कारणांनी अस्वस्थता आहे आणि आंदोलनेही सुरू आहेत. हे देश आपल्याप्रमाणे एके काळच्या ब्रिटिश साम्राज्याचा भाग होते. दुसऱ्या महायुद्धानंतर ग्रेट ब्रिटनला अवकळा आली आणि साम्राज्याचा हा डोलारा सांभाळणे त्यांना झेपेनासे झाले. परिणामी हे देश 'स्वतंत्र' झाले. त्यांना स्वनिर्णयाचा अधिकार मिळाला. पण त्यापैकी एकाही देशात आज निर्भेळ नागरिककेंद्री लोकशाही नाही. याचे कारण या देशांस लोकशाहीची आस नाही, असे नाही. तर या देशांतील नागरिकांत सरंजामी मानसिकताच अजूनही आढळते. राजा हा देव, राजा हा देवाचा प्रतिनिधी, राजा सर्वश्रेष्ठ इत्यादी भाकडकथा या देशांतील नागरिक अजूनही चघळत असतात. लोकशाही रचनेसाठी जी एक नागरिकांची परिपक्व मानसिकता लागते ती या देशांतील नागरिकांत अजूनही पुरेशी नाही. कायद्यासमोर सर्व समान हे वरकरणी साधे तत्त्व. त्यात लोकशाहीचा प्राण असतो. पण या तत्त्वाची प्राणप्रतिष्ठाच या देशांत होऊ शकली नाही. 'कायद्यासमोर सारे समान; पण काही अधिक समान' या ऑर्वेलियन वचनावर या देशांत सर्रास श्रद्धा दिसून येते. मग ते केवळ अर्थशास्त्राचे नोबेल मिळाले म्हणून देशाचे सुकाणू महंमद युनूस यांच्या हाती देणारा बांगलादेश असो की धर्मवादात प्रगतीचा आसरा पाहणारा पाकिस्तान असो वा लष्करशाहीखाली चेपला गेलेला म्यानमार असो. नागरिकांच्या विचारकेंद्रांत प्रबुद्ध लोकशाहीची मशागत झाली नाही तर काय होऊ शकते याची ही सर्व उदाहरणे. त्यांची दखल घेताना काही निरीक्षणे सूचक ठरतात. पहिले म्हणजे खऱ्या लोकशाहीचे मूर्तिमंत उदाहरण असणाऱ्या अमेरिकेतच जर लोकशाहीच्या चिंध्या होत असतील आणि तेथील नागरिक हे वास्तव हतबुद्ध होऊन पाहत बसले असतील तर अन्य देशांस लोकशाही आश्वासक कशी काय वाटेल, हा प्रश्न. अमेरिकेत लोकशाही प्रक्रियेतून सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांचे वर्तन पाहता लवकरच त्यांनी अश्वमेध यज्ञाची घोषणा केल्यास आश्चर्य वाटू नये. अनभिषिक्त सम्राटच जणू ते! कधी कोणता आदेश देतील आणि कधी कोणता दिलेला आदेश मागे घेतील याची हमी नाही. अशा वेळी लोकशाही खोलवर रुजलेल्या अमेरिकेसारख्या देशातच लोकशाही बागबूग करत असेल तर जेथे ती मुळातच स्थिर नाही; अशा देशांतील लोकशाहीचा कसा भरवसा धरणार? तसेच लोकशाहीच्या गळ्यास नख अमेरिकेतच लागते आहे असे नाही. लोकशाहीच्या नावे आणाभाका घेणाऱ्या अन्य अनेक देशांतील लोकशाहीदेखील किती दोलायमान आहे याचे अनेक दाखले कोणीही सहज देईल. अमेरिकेतही २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकांत लोकशाहीचा सर्वाधिक फायदा निवडक मूठभरांना होतो असा प्रचार झाला आणि तो करणारे डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी पहिल्यांदा निवडून आले. म्हणजे मतदानाद्वारे नागरिकांनी आपला अर्थकारणावरचा राग राजकारणावर काढला, असा त्याचा अर्थ. तथापि ट्रम्प यांच्यामुळे अर्थव्यवस्था फार उजळू लागली असे झालेले नाही. आता तर दुसऱ्या खेपेस ट्रम्प यांची अमेरिकाही कुडमुड्या भांडवलशाहीसम वागू लागलेली आहे. या अशा कुडमुड्या भांडवलशाहीत सरसकटपणे सर्व उद्योगांचे भले होत नाही. तर मूठभरांच्या ताटातच सर्व काही पडते. याचा अर्थ लोकशाही प्रामाणिकपणे, सर्व नागरिक समभाव दर्शवत राबवली गेली नाही तर नागरिकांचा या व्यवस्थेवरचा विश्वास उडू लागतो. अमेरिकेत तेच होताना दिसते. १ एप्रिल राशिभविष्यः अंगारकी विनायक चतुर्थीला बाप्पा कोणत्या राशीच्या पाठीशी उभा राहणार? कोणाला फायदा तर कोणाची इच्छापूर्ती होणार आणि नेपाळमधील रोषामागीलही कारण तेच. काही जणांच्या मतानुसार नेपाळमध्ये पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठीच्या आंदोलनास भारताची फूस आहे. या अशा विषयांतील खरेखोटेपणा कधीही सिद्ध होत नाही. पण ही बाब खरी असेल तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. याचे कारण राजेशाही असताना नेपाळ हे एक 'हिंदु राष्ट्र' होते आणि आता ते 'संघराज्यीय लोकशाही प्रजासत्ताक' (फेडरल डेमॉक्रॅटिक रिपब्लिक) आहे. आपल्याकडे भारतही हिंदु राष्ट्र व्हावे यासाठी किती जणांच्या भावना तीव्र आहेत आणि त्या किती तीव्रपणे व्यक्त होतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. तसेच आपल्याकडेही अंदाधुंद बेशिस्त लोकशाहीपेक्षा 'कल्याणकारी राजेशाही' बरी असे मानणाऱ्यांची संख्या कमी नाही. एकचालकानुवर्तित्व हे अंतिमतः हुकूमशाहीस जन्म देते याची जाणीव असणारे आपल्याकडेही तसे अल्पमतातच आहेत. अशा वेळी नेपाळमध्ये राजेशाहीच्या फेरस्थापनेची मागणी होणे आणि तीस भारताचा कथित पाठिंबा किंवा फूस असणे या दोहोंतील समान सांधा लक्षात घ्यायला हवा. भारताचा नेपाळमधील घटनांत खरोखरच हात असेल तर त्यामागे बांगलादेशात आपले पोळलेले हातही कारणीभूत नसतीलच असे नाही. अत्यंत धूर्त धुरंधर इत्यादी सुरक्षा सल्लागार मुत्सद्यांत्तम परराष्ट्रमंत्री असतानाही बांगलादेशातील घटनांनी भारतीय व्यवस्थेस गुंगारा दिला, असे मानले जाते. म्हणजे तेथे इतका उत्पात होणार आहे याचा अंदाज आपणास आधी आला नाही. अशा वेळी नेपाळात आधीपासूनच सक्रिय असलेले बरे असा विचार आपल्या व्यवस्थेने केला असणे शक्य आहे. काहीही असो. या हिमालयी देशात जे काही सुरू आहे त्यामागील 'राजेशाही म्हणावी आपुली' ही भावना आणि तीस आपले कथित समर्थन हा योगायोग खचितच दुर्लक्ष करावा असा.

सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त!

(२ एप्रिलः छत्रपती राजर्षी शाहू महाराज राज्याभिषेक दिन)



राजर्षी शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. सन १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते सन १९२२मधील त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. सदर माहितीपूर्ण संकलित लेख वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत... संपादक.

महाराष्ट्राला पुरोगामी राज्याचा चेहरा देण्यात सिंहाचा वाटा असणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक आज दि.२ एप्रिल १८९४ रोजी झाला. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आणि बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी अस्पृश्य आणि मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. प्राथमिक शिक्षण मोफत करणे, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करणे, आरक्षणाच्या धोरणाची सुरुवात करणे, कोल्हापूर संस्थानात शेतीसह उद्योगाला चालना देण्यासारखी अनेक महत्त्वाची कार्ये त्यांच्या काळात पार पडली. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित- अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना 'राजर्षी' ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास 'फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे म्हणतात.

शाहू महाराजांचा जन्म दि. २६ जून इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्?नी आनंदीबाई यांनी दि. १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच दि. १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाईचे वय १२ वर्षांहून कमी होते. दि. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण-राज्याभिषेक समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते.

राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. महाराजानी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

छ.शाहू महाराजांनी या शाळा सुरू केल्या- १. प्राथमिक शाळा, २. माध्यमिक शाळा, ३. पुरोहित शाळा, ४. युवराज/सरदार शाळा, ५. पाटील शाळा, ६. उद्योग शाळा, ७. संस्कृत शाळा, ८. सत्यशोधक शाळा, ९. सैनिक शाळा १०. बालवीर शाळा ११. डोंबारी मुलांची शाळा, १२. कला शाळा इत्यादी. छ.शाहू महाराजांनी सुरू केलेली शैक्षणिक वसतिगृहे अशी आहेत- १. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस-१९०१, २. दिगंबर जैन बोर्डिंग-१९०१, ३. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह-१९०६, ४. मुस्लिम बोर्डिंग-१९०६, ५. मिस क्लार्क होस्टेल-१९०८, ६. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग-१९०८, ७. श्री नामदेव बोर्डिंग-१९०८, ८. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह-१९१२, ९. श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह-१९१५, १०. इंडियन ख्रिश्चन होस्टेल-१९१५, ११. कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह-१९१५, १२. आर्यसमाज गुरुकुल-१९१८, १३. वैश्य बोर्डिंग-१९१८, १४. ढोर चांभार बोर्डिंग-१९१९, १५. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह-१९२०, १६. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस-१९२०, १७. इंडियन ख्रिश्चन होस्टेल-१९२१, १८. नाभिक विद्यार्थी वसतिगृह-१९२१, १९. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग-१९२०, २०. श्री देवांग बोर्डिंग-१९२०, २१. उदाजी मराठा वसतिगृह, नाशिक-१९२०, २२. चौथे शिवाजी महाराज मराठा वसतिगृह, अहमदनगर-१९२०, २३. वंजारी समाज वसतिगृह, नाशिक-१९२०, २४. श्री शाहू छत्रपती बोर्डिंग, नाशिक-१९१९, २५. चोखामेळा वसतिगृह, नागपूर-१९२०, २६. छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे-१९२० आदी होत.

वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रखर झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. महाराजांनी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांनी मूकनायक हे पाक्षिक दि.३१ जानेवारी १९२०ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ २५०० रुपयांची भरघोस मदत केली होती. अशा या लोकप्रिय लोककल्याणी राजांचे मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी दुःखद निधन झाले.

!! छ.राजर्षी शाहू महाराज राज्याभिषेक दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

विकास...

लोभसवाणा शब्द
सबका हो विकास
ऐकायां अति गोड
वाटे भारी झकास

दिपवून टाक डोळे
लखलखाट प्रभास
आवडते स्वप्न
रंजन
सत्यांहून प्रिय भास

कठीण जरी असले
जिंका पूर्ण विश्वास
गुलाम बनो स्वेच्छेने
विचारुन घेती श्वास

पंगतीत पाळा पथ्य
स्वादिष्ट आरंभघास
चटक लावा नशिली
आपला लागे ध्यास

सवय आपली लावा
प्रारंभीपडते सायास
गातीलं भजनमाधुर्ये
सत्यातयेतीलकयास

वर्णनअसले करायचे
हारां सम भासे फास
बंदिस्तसाखळी छान
भलावाटे विजनवास

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

काळे...

बंद करुनि
हे डोळे
दिसते कधी सगळे
नजरे पलीकडले ते
चित्र विचीत्र वेगळे

प्रकाश असून स्पष्ट
संभ्रमा सारे गोंधळे
डोळसां पेक्षा सक्षम
मात देती ते आंधळे

कुंचले होई स्तंभित
सप्तरंगास झाकाळे
उजळूनटाके मनास
उठावदार रंग काळे

प्रभावशाली रे काळे
कुणातसहज घुसळे
रंग देतात आपलाचं
उजळ रंगात मिसळे

व्यक्त करून निषेध
काळे होणार मोकळे
उध्वस्त करे झळाळी
अंमळ उशीराने कळे

उठूनदिसायला पांढरे
काळे बनवले ते फळे
कौतुक सफेद रंगाचे
नभात विहारी बगळे

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट

'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाच्या निमित्ताने लखनऊमध्ये रंगल्या गप्पा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज, मराठा साम्राज्य आणि एकूणच शिवकालीन काळ 'शिवराज अष्टक' या मराठी चित्रपट शृंखलेच्या माध्यमातून मांडणारे प्रसिद्ध दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर हे संत साहित्याचे समृद्ध संचित घराघरात पोहोचवण्यासाठी सज्ज झाले आहेत. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी सोमवारी लखनऊ येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतली. या भेटीत उभयतांनी इतिहास, कला, संस्कृती आदी विषयांवर संवाद साधला.

संत मुक्ताबाईंचे आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रेरणादायी चरित्र उलगडून दाखवणारा दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा बहुप्रतीक्षित मराठी चित्रपट १८ एप्रिलपासून प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची लखनऊ येथे भेट झाली.

यावेळी अभिनेता अजय पूरकर, आळंदीच्या संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिराचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ देखील उपस्थित होते. या भेटीत योगी आदित्यनाथ यांनी सर्वांशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्याली. तसेच 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाविषयी जाणून घेत योगी आदित्यनाथ यांनी चित्रपटाच्या संपूर्ण चमूला शुभेच्छा दिल्या.

तर दिग्पाल लांजेकर यांनी योगी आदित्यनाथ यांना 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाच्या स्क्रीनिंगचे खास निमंत्रण दिले. 'नाथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांचा अलौकिक संबंध या सगळ्या क्रांतीत या चारही भावंडांच्या योगदानावर योगी आदित्यनाथ यांनी चर्चा केली. एकंदरीत त्यांचा संत साहित्य आणि धर्म-संस्कृती याविषयीचा गाढा अभ्यास थक्क करणारा होता', असे दिग्पाल लांजेकर यांनी सांगितले.

चाकणमध्ये मोटार चालकाने दुचाकीस्वाराला नेले फरफटत

वृत्तसंस्था ■ पुणे

पिंपरी : पुणे-नाशिक महामार्गावर खेड तालुक्यातील खुंबरेनगर येथे मोटार चालकाने दुचाकीला धडक देऊन काही अंतर फरफटत नेले. यामध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. निलेश दत्तात्रय पाटेकर (वय २२, रा. वाकी, खेड), नागेंद्र रामचंद्र प्रजापती (वय २१) अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी निलेश यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलेश आणि त्यांचा मित्र नागेंद्र हे दुचाकीवरून कामावर जात होते. पुणे-नाशिक महामार्गावरून जात असताना खुंबरेनगर येथे त्यांच्या दुचाकीला मोटारीला पाठीमागून जोरात धडक दिली. धडक दिल्यानंतर मोटार चालकाने निलेश आणि नागेंद्र दोघांनाही काही अंतर फरफटत नेले. त्यानंतर मोटार चालक पळून गेला. या अपघातात निलेश आणि नागेंद्र दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. चाकण पोलीस तपास करीत आहेत.

कंटेनरची दुचाकीला धडक, पती-पत्नी जखमी

गोडाऊन चौक मोशी येथे एका कंटेनरने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील पती-पत्नी जखमी झाले आहेत. महादेव विश्वनाथ गरड (वय ४५, रा. चऱ्होली बुद्रुक) आणि त्यांची पत्नी सुजाता महादेव गरड (वय ३७) अशी जखमींची नावे आहेत. महादेव गरड यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार कंटेनर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महादेव गरड आणि त्यांच्या पत्नी सुजाता गरड त्यांच्या दुचाकीवरून कामावरून घरी जात होते. भोसरी येथून मोशीकडे जात असताना गोडाऊन चौक मोशी येथे कंटेनर चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर सिग्नल तोडून हयगयीने चालवला. कंटेनरने गरड यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये महादेव गरड आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. तसेच त्यांच्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

पिस्तूल बाळगल्या प्रकरणी एकास अटक

बेकायदेशीरपणे पिस्तूल बाळगल्या प्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली. ही कारवाई चांदखेड-कासारसाई रोड, मावळ येथे करण्यात आली. ओमकार अनिल राऊत (वय ३८, रा. नेरे दत्तवाडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार सचिन काचोळे यांनी शिरगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चांदखेड ते कासारसाई रोडवर शिरगाव पोलिसांनी ओमकार राऊत याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे २५ हजार १०० रुपये किमतीचे एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस आढळून आले. शिरगाव पोलीस तपास करीत आहेत.

झोपडपट्ट्यांमध्ये पाण्याची उधळपट्टी; अनेक ठिकाणी जलवाहिन्यांना गळती, वापरावर नियंत्रणाची गरज

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला असून महापालिकेने राज्य शासनाकडे राखीव पाणीसाठा वापरण्याची मागणी केली आहे. मात्र, शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांदरम्यान जलवाहिन्यांना गळती लागून शेकडो लिटर पाण्याचा अपव्यय होत आहे. अशातच अनेक झोपडपट्टी परिसरात मोठ्या प्रमाणात पाण्याची उधळपट्टी सुरू असून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे.

झोपडपट्टी भागातील अनेक गल्ली - बोळांमधील जलवाहिन्यांना बूच लावण्यात येत नसल्यानेही मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. अनेकदा चिंचोळ्या गल्ल्या आणि प्रत्येक बोळांमध्ये लक्ष ठेवणे महापालिकेला शक्य होत नाही. अशी प्रकरणे निदर्शनास येत नसल्याने संबंधितांवर कारवाई होत नाही.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ऊर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या धरणांमध्ये पाणीसाठा ३५ टक्क्यांखाली गेला आहे. वातावरणातील उष्ण्यामुळे मुंबईकरांची पाण्याची गरजही वाढली आहे. मुंबईकरांना पाणी कपातीचा सामना करावा लागू नये, यासाठी पालिकेने राज्य शासनाकडे राखीव पाणीसाठा वापरण्यासाठी विनंती केली आहे.

दरम्यान, मुंबईत सुरू असलेल्या रस्ते काँक्रिटीकरणादरम्यान दररोज जलवाहिन्या फुटण्याच्या छोट्या-मोठ्या घटना घडत असून त्यातूनही पाण्याची नासाडी होत आहे. कमी दाबाने पाणी येणे, अपुरा पाणीपुरवठा आदी समस्येमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. मात्र, अनेक ठिकाणी विशेषतः झोपडपट्टी परिसरात पाण्याचा अपव्यय होत आहे.

गैरसोय होण्याची शक्यता

विकासकामे, मेट्रो प्रकल्प, जलवाहिन्या बदलण्याची कामे आदी विविध कामांमुळे दररोज जलवाहिन्यांना गळती लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे पाण्याची नासाडी होते. तसेच महापालिकेच्या कामगारांनाही जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणी साठा कमी होऊ लागला आहे. त्यातच दररोज फुटणाऱ्या जलवाहिन्यांतून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते. झोपडपट्टी आणि अन्य परिसरात विनाकारण होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी महापालिकेने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध कारणांमुळे दररोज होणारा पाण्याचा अपव्यय सुरूच राहिल्यास मुंबईकरांची पुरेशा पाण्याअभावी गैरसोय होण्याची दाट शक्यता आहे.

वाहत्या पाण्यातच कामे

झोपडपट्टी भागातील अनेक घरांमध्ये वाहत्या पाण्यात कपडे धुणे, भांडी घासणे, फरशी पुसणे आदी दैनंदिन कामे केली जातात. त्यामुळे गरजेपेक्षा अधिक पाण्याचा वापर होतो. तसेच, अनेक गल्ली-बोळांत पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या बंद केल्या जात नाहीत. विनाकारण हजारो लिटर पाण्याची नासाडी होते. महापालिकेतर्फे झोपडपट्टीतील प्रत्येक घरात २२५ लिटर पाणीपुरवठा केला जातो. मात्र, नागरिकांच्या चुकीच्या सवयींमुळे प्रमाणापेक्षा अधिक पाणी वाया जाते. जलवाहिन्यांना बूच, व्हॉल्व्ह न बसवण्याच्या घटनांमध्ये वापरकर्त्यांवर पाण्याची नासाडी केल्याप्रकरणी कारवाई केली जाते. मात्र, झोपडपट्टी भागातील चिंचोळ्या गल्ल्या आणि बोळांमध्ये लक्ष ठेवणे पालिकेला शक्य नसल्याने संबंधितांवर कारवाई होत नाही.

फुकटच्या योजना बंद करा; उधळपट्टी थांबवा : मुख्य सचिवांचा महायुती सरकारला दणका !

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : राज्याचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आर्थिक परिस्थितीचे चित्र अत्यंत स्पष्ट झाले आहे. जमा आणि खर्चाचा ताळमेळ साधणे आता कठीण होणार असल्याचे लक्षात येताच राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी परिपत्रक जारी करून महायुती सरकारला खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश जारी केले आहेत. एवढेच नव्हे तर फुकट अनुदानाच्या योजना बंद करुन केली जाणारी उधळपट्टी तात्काळ थांबवा, असा जबरी दणका राज्याच्या मुख्य सचिवांनी महायुती सरकारला दिला आहे. त्यामुळे 'लाडकी बहीण' योजनेतील वाढीव २१०० रुपये नजीकच्या काळात तरी मिळण्याची शक्यताच आता दूरावली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर २०१९ मध्ये देशातील सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची राष्ट्रीय परिषद झाली होती. त्यात मर्यादित निधीचा चांगला प्रकारे वापर करण्याबरोबरच अनुत्पादक अनुदान फुकट योजना कमी करण्याबरोबरच उत्पादक भांडवली खर्च वाढवण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या काळात महायुती सरकारने लोकप्रिय योजनांच्या घोषणा केल्या. त्यानंतर राज्याची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे कोलमडून गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आता राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा तब्बल ४५ हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. तर त्यात एक लाख ३६ हजार कोटी रुपयांची राजकोषीय तूट आहे. एकूण महसुली जमेपैकी ५७ टक्के तरतूद ही अनिवार्य बाबींसाठी खर्च करण्यात येते. त्यामुळे मुख्य सचिवांनी पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करीत महायुतीच्या राज्य सरकारला आर्थिक शिस्त लावण्यासाठी चक्क परिपत्रकच जारी केले आहे.

योजनांना चाप बसणार

मंत्रिमंडळाने निर्णय घेताना आर्थिक भारामध्ये किंवा निकषामध्ये काही बदल किंवा सुधारणा सुचवल्यास त्याचे आदेश जारी करण्यापूर्वी वित्त व नियोजन विभागाची पूर्वसहमती घ्यावी, असेही नमूद केले आहे. त्यामुळे २१०० रुपयांच्या घोषणेची अंमलबजावणी करण्यासापूर्वी सरकारला वित्त व नियोजन विभागाची सहमती घ्यावी लागणार आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत वित्त विभाग कोणत्याही वाढीव रकमेला तूर्त तरी हिरवा कंदिल दाखवण्याची शक्यता नाहीये. त्यामुळे महायुतीची 'लाडकी बहीण' व इतर लोकप्रिय योजनांना आता पूरता चाप बसणार हे स्पष्टपणे दिसत आहे.

पत्रकात काय नमूद केले आहे...?

जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून अनिवार्य खर्च मर्यादित ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात यावा, असे राज्याच्या मुख्य सचिवांनी जारी केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजना बंद करणे अथवा एकत्रीकरण करणे आणि त्याची माहिती मंत्रिमंडळ प्रस्तावात नमूद करावी. अनिवार्य खर्चाबाबत वित्त विभागाची तसेच कार्यक्रम खर्चाबाबत नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय मंत्रिमंडळ टिप्पणीत समाविष्ट असल्याखेरीज प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येऊ नये, अशाही खरमरीत सूचना जारी केल्या आहेत.

दरम्यान, राज्याच्या मुख्य सचिवांनी खडे बोल सुनावत दिलेल्या या आदेशामुळे फुकटात राबविले जाणाऱ्या किती व कोणत्या योजना खरोखरच बंद केल्या जातील किंवा नाही, अधोरेखित पैशाची उधळपट्टी थांबवली जाणार का नाही, हे नजिकच्या काळात दिसून येणारच आहे. पंतप्रधान मोदींच्या आदेशाचे अनुपालन म्हणून मुख्य सचिवांनी काढलेल्या आदेशाचे पालन करणार, का, महायुती सरकार तोंडावर असलेल्या महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतदारांना पुन्हा एकदा गोंजारण्यासाठी मुख्य सचिवांच्या आदेशाला 'केटो' दाखवत, पंतप्रधानांचाही अवमान करणारे, हे पाहावे लागणार आहे. तद्वतच त्यासाठी विरोधकांनाही डोळ्यात तेल घालून जागता पहारा द्यावा लागेल एवढे सूचकपणे सांगावेसे वाटते.

देशातील न्यायालयीन स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात



परभणी ■ दत्तात्रय कराळे

सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांचं परखड भाष्य

परभणी : लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेबाबत सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. एन. श्रीकृष्ण यांनी परखड मत व्यक्त केले आहे. त्यांनी देशातील जनतेच्या मूलभूत हक्कांवरही भाष्य केले आहे. सध्या ५ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत. त्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. न्यायदानात होत असलेला कमालीचा विलंब बघून त्यावर त्यांनी न्यायदानात विलंब होणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच आहे, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. एवढेच नाही तर देशातील विद्यमान न्यायालयीन स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य खरोखरच धोक्यात असल्याचे परखड भाष्य करीत त्यांनी कमालीची चिंता व्यक्त केली आहे.

सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि देशातील सर्व कनिष्ठ न्यायालयांमध्ये पाच कोटींहून अधिक खटले प्रलंबित असल्याने देशात मानवी हक्कांचा मुद्दा अधोरेखीत होत आहे. लोकशाही हक्क आणि धर्मनिरपेक्षता संरक्षण समितीद्वारा आयोजित लोकशाही हक्क आणि धर्मनिरपेक्षता यावरील राष्ट्रीय परिषदेत न्या.श्रीकृष्ण बोलत होते. देशात मानवाधिकार आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याबद्दल त्यांनी कमालीची चिंता व्यक्त केली. त्याचबरोबर न्यायदानात विलंब करणे म्हणजेच न्याय नाकारणे आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

असहमती दर्शविणे आणि निषेध व्यक्त करणे, हा जनतेचा अधिकार आणि लोकशाहीचा आत्मा आहे, असे ते म्हणाले. लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांना समान वागणूक दिली पाहिजे, कायद्याचे राज्य प्रबळ असले पाहिजे आणि धर्मनिरपेक्षता म्हणजे इतर धार्मिक श्रद्धा यांना सन्मान देण्याची भावना असणे गरजेचे आहे. मात्र, गेल्या १० वर्षांपासून देशात न्यायालयीन स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे, असेही ते म्हणाले.

लोकांचे हक्क आणि अधिकार अबाधित राहावेत, यासाठी आणि लोकशाहीवरील हल्ल्यांविरुद्ध लढण्यासाठी समाजाला अग्रणी पुढाकार घ्यावा लागेल, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. पोलीस कोठडी किंवा न्यायालयीन कोठडीतील मृत्यू, बनावट चकमकी आणि तुरुंगातील छळ या मुद्द्यांवरही सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश ए. के. पटनायक यांनी सांगितले की, देशातील लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी जबाबदार असलेल्या संस्थाच त्याचे सर्वाधिक उल्लंघन करत आहेत. कोठडीतील मृत्यू, बनावट चकमकी, त्यात केले जाणारे एन्काउंटर आणि तुरुंगातील छळ, आदींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

आ.च.विद्यालय वआदर्श ज्युनिअर कॉलेजमध्ये नवविद्यार्थी प्रवेशोत्सव संपन्न

सातारा ■ प्रतिनिधी



गुढीपाडवा व मराठी नूतन वर्षाचे औचित्य साधून इ.५वी ते १२ वी मध्ये प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी नवप्रवेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पाल्य व पालकांच्या समवेत संपन्न झाला.

सरस्वती प्रतिमेचे पूजन व पाटी पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे सचिव, शेतीमित्र श्री अशोकराव थोरात यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले.

यावेळी श्री सदाशिव रामचंद्र पवार, सौ मीना सदानंद कोळी, विकास शेवाळे उपस्थित होते. श्री गजानन जनार्दन शिर्के यांनी श्रीफळ वाढवून नवीन प्रवेशाचा श्री गणेशा केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोकराव थोरात यांनी शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रत्येक पालक आपल्या पाल्याविषयी जागरुक, सतर्क असावा असे मत व्यक्त केले. तसेच जो जे वांछील तो ते लाहो अशी सर्व धर्म समभाव वृत्तीने ईश्वरचरणी प्रार्थना करून गुढीपाडवा व ईद या सणाच्या शुभेच्छा दिल्या व पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

कोळशाला हिरा बनवण्याचे कार्य आ.च.विद्यालय अविरत आहे. स्वानुभवातून प्रचिती आलेले श्री विकास शेवाळे शाळेविषयी व्यक्त होत होते.

गुढीपाडवा नूतन वर्ष व ईद सणाचे स्वागत करून नवीन प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालकांचे स्वागत वही, पेन, खाऊ देऊन सचिव श्री.अशोकराव थोरात व शिक्षकांच्या हस्ते संपन्न झाले.

उपमुख्याध्यापक श्री.ए.बी. थोरात, पर्यवेक्षक बी.जी. बुरुंगले, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आदर्श ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख सौ शिला पाटील, सर्व प्राध्यापक, परिसरातील पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकामध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.ए.एस.कुंभार यांनी गुढीपाडवा सणाचे महत्त्व सांगून शिक्षण घेणे आज काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करुन विविध शालेय उपक्रमांची माहिती सांगून पालकांचे प्रबोधन केले. सूत्रसंचालन सौ.सुरेखा खंडागळे यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार विद्यालयाचे उप मुख्याध्यापक श्री.ए.बी.थोरात यांनी मानले.

युवासेना युवाविजय महाराष्ट्र दौरा संपन्न

आंबेगाव ■ संतोष गावडे



आंबेगाव : महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे व युवासेना मार्गदर्शक खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना कार्याध्यक्ष मा.पूर्वेशजी सरनाईक, युवासेना मुख्य सचिव राहुलजी लोंढे व युवासेना सचिव किरणजी साळी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात युवासेनेचा युवाविजय दौरा सुरू आहे. दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यात मावळ लोकसभा मतदार संघातील मावळ विधानसभेचा दौरा युवासेना विभागीय सचिव विश्वजीत बारणे, युवासेना कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, कौस्तुभ कुलकर्णी, रुपेश कदम यांच्या प्रमूख उपस्थितीत उदंड प्रतिसादासह उत्साहात पार पडला.

आई एकवीरा देवीचे मनोभावे दर्शन घेऊन दौऱ्याची सुरवात करण्यात आली. त्यांनतर लोणावळ्यात युवासेना वळवण कॉलेज कक्ष शाखेचे उद्घाटन झाल्यानंतर लोणावळा येथील हॉटेल चंद्रलोक मध्ये युवासेनेचा युवा संवाद मेळावा शेकडो युवासैनिकांच्या उपस्थित पार पडला. मेळावा संपन्न झाल्यानंतर वडगाव शहर व देहूरोड युवासेना शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या संपूर्ण दौऱ्यात युवासेना कार्यकारिणीने स्थानिक युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवकांच्या अपेक्षा जाणून घेत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, युवासेना जिल्हा समन्वयक सागर पाचर्णे, युवासेना उपजिल्हाप्रमुख दत्ता केदारी, युवासेना मावळ तालुकाप्रमुख विशाल हुलावळे, युवासेना पिंपरी चिंचवड शहरप्रमुख माऊली जगताप, लोणावळा शिवसेना शहरप्रमुख संजय भोईर, महिला आघाडी शहर संघटक सौ.मनीषाताई भांगरे, युवासेना शहरप्रमुख विवेक भांगरे, वडगाव युवासेना शहरप्रमुख सागर वारुळे, देहूरोड युवासेना शहरप्रमुख संदिप डुलगज यांच्यासह मावळ तालुक्यातील युवासेना पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंचरच्या कन्येला मिळाला राष्ट्रीय पुरस्कार

आंबेगाव ■ संतोष गावडे



आंबेगाव : भाजपा जनसंपर्क कार्यलयात अविना मयुर शिंदे इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या कन्येला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल भाजपा नेते जनसेवक संजय भाऊ थोरात यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

मंचर शहरातील सुकन्या अविना मयुर शिंदे हिला ण्ठ्ठि ण्ठ्ठि, नवी दिल्ली, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित ॅत्त ह्र्ी ण्प्त्हे ॅर्ल्ल्ूदर्हेत ण्दहूाहू ण्दस्जूग्गदह २०२४-२५ मध्ये ॅूं ॅूंदे ग्ह ग्गद कॅटेगरी हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

संजय भाऊ थोरात म्हणाले की, तिच्या अभिनयाने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेला हा गौरव तिच्या मेहनतीला, समर्पणाला आणि कौशल्याला मिळालेली मोठी दाद आहे हा आमच्यासाठी व मंचरकरांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे अविनाच्या ह्या पुरस्कारामध्ये आई-वडील व शिक्षकांचा ही मोठा वाटा आहे इतर विद्यार्थ्यांनी अविनाचा आदर्श घेतला पाहिजेल.

अविनाच्या यशासाठी मनःपूर्वक अभिनंदन आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी अनंत शुभेच्छा. यावेळी भाजपा नेते जनसेवक संजय भाऊ थोरात, आदर्श शिक्षक जितेंद्र त्रिवेदी सर, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या आदर्श शिक्षिका मृणाल गांजाळे, स्नेहल ताई चासकर यावेळी उपस्थित होते.

आबासाहेब सोनवणे मित्रपरिवार यांच्याकडून निर्वी येथे मोफत संपूर्ण शरीराच्या तपासणी शिबिराचे आयोजन



शिरुर (पुणे) ■ शकील मनियार

शिरूर :भाजपा तालुका अध्यक्ष आबासाहेब सोनवणे मित्रपरिवार यांच्या वतीने बुधवार दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी जापानीज टेक्नॉलॉजी मशीनच्या सहाय्याने फुल बॉडी चेकअप पूर्ण तपासण्या मोफत करण्यात येणार आहे निर्वी येथील पावन दक्षिण मुखी हनुमान मंदिर या ठिकाणी सकाळी ९:०० ते सायं. ५:०० वा. या कालावधीत मोफत तपासणी करण्यात येणार आहे यावेळी तज्ञ डॉक्टरांचे रुग्णांना मोफत मार्गदर्शन लाभणार आहे या शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आबासाहेब सोनवणे मित्रपरिवार यांच्याकडून करण्यात आले आहे.

पक्षी वाचवा निसर्ग वाचवा ; न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयाचा आदर्श उपक्रम

सातारा ■ प्रतिनिधी



सातारा: श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एक आदर्श उपक्रम राबविला असुन सध्या उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढु लागला आहे मानवा सह पशु पक्षांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे कडक उन्हात पाण्यावाचून पक्षांचा मृत्यूचे प्रमाण वाढतच असते सतत होणारी अवैद्य वृक्षतोड यामुळे जंगले पक्षी नामशेष होऊन त्यांचा किलबिलाट लुप्त होत असल्याचे चित्र दिसत आहे .जनजागृती म्हणून या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या आदर्श उपक्रमाचे आयोजन केले पक्ष्यां साठी वाटीभर पाणी मूठभर धान्य शाळेच्या आवारात ठेवून पक्षी वाचवा निसर्ग वाचवा असा शुभ संदेश दिला आहे अन्न पाणी ठेवून चिंमण्या सह पक्ष्यांची संख्या वाढवता येईल शिवाय मुलांमध्ये ही आवड निर्माण होईल या उद्देशाने शाळेचे मुख्याध्यापक श्री खराते सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम विद्यार्थ्यांनी राबिवला या आदर्श उपक्रमाचे कौतुक संस्थेचे उपाध्यक्ष सचिव सहसचिव तसेच सर्व संचालक मंडळ तसेच पालक व पिलाणी ग्रामस्थ यांनी केले

हजूर साहिब नांदेड व औरंगाबाद रेल्वे स्थानकांत २७३ विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाईचा बडगा

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : हजूर साहिब नांदेड व औरंगाबाद या दोन रेल्वे स्टेशनांवर आयोजित व्यापक तिकीट तपासणी मोहिमेदरम्यान २७३ विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

आज शुक्रवार, दि.२८ मार्च २०२५ रोजी नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती नीति सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित व्यापक 'तिकीट तपासणी' मोहीम यशस्वीरित्या पार पडली. या मध्ये नांदेड स्थानकातील अनधिकृत प्रवेश आणि रेल्वे प्रवासाला आळा घालण्याच्या उद्देशाने केलेली ही कारवाई वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. जे. विजय कृष्णा यांच्या निरिक्षणाखाली करण्यात आली.

या तपासणीत १० तिकीट तपासणीसांचा सहभाग होता. वाणिज्य निरिक्षक आणि विभागीय कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेत तिकीट तपासणी कामात मदत केली. यावेळी रेल्वे संरक्षण दलाच्या (आरपीएफ) कर्मचाऱ्यांचे या कारवाईत महत्त्वपूर्ण असे योगदान राहिले आहे.

तपासणी दरम्यान, अवैधरित्या प्रवास करणाऱ्या व्यक्तींची ओळख पटवून, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन नंतर त्यांना रेल्वे परिसरातून बाहेर हुसकावण्यात आले, ज्यामुळे अन्य प्रवाशांची सुरक्षितता आणि सुरक्षा सुनिश्चित झाली.

हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानक येथील तिकीट तपासणीचे निकाल खालीलप्रमाणे :

नोंदवण्यात आलेल्या एकूण प्रकरणांची संख्या १४१, ज्यामध्ये एकूण रुपये १,२३,०६० एवढा दंड वसूल करण्यात आला.

औरंगाबाद रेल्वे स्थानकावर नांदेड विभागीय सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक एन.सुब्बा राव यांनी तिकीट तपासणी केली. या व्यापक तपासणीत औरंगाबाद बेसवरील ११ तिकीट तपासणीसांचा वाणिज्य निरिक्षकांसह घेतलेला सहभाग सकारात्मक असाच राहिला. त्यांनी अत्यंत चोखपणे तिकीट तपासणी कामात मदत केली. रेल्वे संरक्षण दलाच्या (इंइ) कर्मचाऱ्यांनी ऑपरेशन दरम्यान महत्त्वपूर्ण मदत केली.

औरंगाबाद येथील तिकीट तपासणीचे निकाल खालीलप्रमाणे :

नोंदवण्यात आलेल्या एकूण प्रकरणांची संख्या १३२ होती, ज्यामध्ये एकूण रुपये ७५,९८५ एवढा दंड वसूल करण्यात आला.

आज करण्यात आलेल्या तिकीट तपासणी मोहिमेत एकूण २७३ विनातिकीट व अवैध प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ज्यामध्ये जवळपास रुपये २ लाखांचा महसूल प्राप्त झाला.

सदर यशस्वी कारवाई रेल्वे प्रवाश्यांची सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सर्व प्रवाशांसाठी सुरक्षित आणि आरामदायी प्रवास अनुभव सुनिश्चित करण्याची वचनबद्धता अधोरेखित करते.

जागतिक वन दिनानिमित्त आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण संपन्न

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगावः दरवर्षी २१ मार्च हा जागतिक वन दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २८ नोव्हेंबर २०१२रोजी जागतिक वन दिवस साजरा करण्याचा ठराव मंजुर केला. २१ मार्च २०१३ रोजी प्रथमच जागतिक वन दिन साजरा करण्यात आला.

वनांचा मानवी जिवनाशी असलेला सरळ संबंध, जंगलावर अवलंबून असणारी, प्राचीन औषध प्रणाली आणि सोबतच जंगलावर आपली उपजीविका भागवणाऱ्या जमाती आणि जैवविविधता. याबाबत समाजामध्ये जागरुकता पसरवण्यासाठी आणि जंगल निर्माण, संवर्धन आणि संरक्षणाच्या उद्देशांसाठी संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ पासून २१ मार्च हा दिवस जागतिक वन दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले.

याच धर्तीवर नेहरू युवा केंद्र, छत्रपती संभाजीनगर व सेवा संकल्प युवा मंडळ, शिंदोळ यांच्या संयुक्त विद्यमाने कै.यशवंतराव चव्हाण माध्य.विद्यालय, किन्ही येथे शालेय स्तरावर चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन वन या विषयावर विविध समाज माध्यम, इंटरनेटच्या माध्यमांतून माहिती गोळा करून आपल्या ज्ञानात भर घालत पर्यावरणाविषयी जागृक रहावे. हा या स्पर्धेमागचा उद्देश होता.

या स्पर्धेत एकूण तीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तर निबंध व चित्रकला या दोन्ही स्पर्धेत प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना सर्पमित्र तथा पर्यावरणप्रेमी सुभाष जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपदक प्रदान करण्यात आले. याप्रसंगी सेवा संकल्प युवा मंडळाचे अध्यक्ष.जगदिश सोनवणे, उदय सोनवणे, मुख्याध्यापक. एन. एन.कुमावत, सेवानिवृत्त शिक्षक श आर. आर. देशमुख, सहशिक्षक व्ही. डी. पाटील, ए. एस. मालकर, लिपीक पी.झेड मोरे, .सेवक एस.टी.. माने, बी.एस.जाधव.यांची उपस्थिती होती.

किसन वीर महाविद्यालयातील प्राध्यापक प्रा. डॉ. सुनील सावंत यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : वाई जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख,माजी उपप्राचार्य, महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य, तसेच शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यापरिषद सदस्य प्रा. (डॉ.) सुनील सावंत यांचा सेवानिवृत्तीनिमित्त संस्थेचे अध्यक्ष मा. मदनदादा भोसले यांच्या हस्ते समारंभपूर्वक सेवागौरव करण्यात आला. डॉ. सुनील सावंत यांनी २७ जून १९८८ पासून ३१ मार्च २०२५ अखेर एकूण ३७ वर्षे पदवी व पदव्युत्तर वर्गांना एकनिष्ठेने व प्रामाणिकपणे अध्यापन केले आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षण लिंबच्या रयत शिक्षण संस्थेच्या प्रतापसिंह हायस्कूलमध्ये तर पदवी शिक्षण रयतच्याच छत्रपती शिवाजी महाविद्यालयात झाले होते. ते इंग्रजी विषय घेऊन बी. ए. ला शिवाजी विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम आले व एम. ए. लातर इंग्रजी विषयात सर्वप्रथम आल्याने बंडो गोपाळा कदम उर्फ मुकादम सुवर्ण पदक त्यांना मिळाले होते. त्यांनी १९९३ साली एम. फिल. पदवी प्राप्त केल्यानंतर २००३ साली शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. (डॉ.) चंद्रशेखर जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी भाषांतर संस्कृतीचा विशेष अभ्यास केला व या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांना दोन मेजर रिसर्च प्रोजेक्ट्स् साठी अनुदान मंजूर केले होते. त्यांनी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, डॉ. द. ता. भोसले व जयसिंगराव पवार यांच्या अनुक्रमे 'सह्याद्रीचे वारे', 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' व 'राजर्षी शाहू छत्रपतीः जीवन व कार्य' या मौलिक मराठी ग्रंथांचे इंग्रजी अनुवाद केले. यातील चव्हाण साहेबांच्या त्यांनी केलेल्या इंग्रजी अनुवादित एका भाषणाला बारावीच्या क्रमिक पुस्तकात समावेश होण्याचे सद्भाग्य लाभले. त्यांनी संपादित केलेला भाषांतराभ्यासावरील संदर्भ ग्रंथ दिल्लीतील नामवंत अटलांटिक प्रकाशन संस्थेने २०१३ मध्ये प्रकाशित केला आहे. त्यांनी मेलबर्न (ऑस्ट्रेलिया), मॅंचेस्टर (इंग्लंड), दिल्ली, हैदराबाद, बंगलोर, चेन्नई, विशाखापट्टणम, भोपाळ, अनंतपूर, गोवा, अहमदाबाद, मुंबई, पुणे, नांदेड इ. ठिकाणी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आपले शोधनिबंध सादर केले होते. यातील ३० इंग्रजी व ३ मराठी शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके व ग्रंथांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी रिसोर्स पर्सन म्हणून ७० पेक्षा जास्त व्याख्याने विविध विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये दिली आहेत.

सावंत सरांना शिवाजी विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांची संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ८ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. व ९ विद्यार्थ्यांनी एम. फिल. पदवी प्राप्त केली आहे. सद्या त्यांच्या २ विद्यार्थ्यांनी पीएच. डी.चे प्रबंध शिवाजी विद्यापीठाला सादर केलेले असून त्यांचे २ विद्यार्थी संशोधन पूर्ण करत आहेत. सावंत सर हे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे आजीव सदस्य असून सुटातफै त्यांना २०१० ते २०१५ या कालावधीत इंग्रजी अभ्यास मंडळ सदस्य व २०१७ ते २०२२ या कालावधीत विद्यापरिषद सदस्य म्हणून विद्यापीठ स्तरावर कार्य करण्याची संधी मिळाली. या कालावधीत त्यांनी शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या क्रमिक तसेच दूरशिक्षण विभागाच्या स्वयं अध्ययन पुस्तकांसाठी लेखन व संपादन केले आहे. किसन वीर महाविद्यालयात त्यांनी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक म्हणून २ वेळा व 'कृष्णाई' नियतकालिकाचे प्रमुख संपादक म्हणून २ वेळा काम केलेले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी असताना विद्यापीठाने त्यांना वाई विभागाचे समन्वयक म्हणूनही नियुक्ती देऊन एकूण ७ महाविद्यालयांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी दिली होती. विद्यापीठ अनुदान आयोग समितीचे समन्वयक असताना त्यांनी अनेक उपक्रम व प्रकल्प यांना अनुदान मंजूर करून घेतले. महाविद्यालयातील लॅग्वेज लॅब उभी करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. संशोधन समितीचे संचालक म्हणून काम करताना त्यांनी अनेक संशोधनविषयक कार्यशाळा आयोजित केल्या.सावंत सरांना २००८ साली शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संशोधन कार्यासाठी सातारा येथील साहित्य कला प्रतिष्ठान व सातारा जिल्हा इंग्रजी शिक्षक संघटना तसेच वाईतील रोटरी क्लब, कृष्णाई कला मंच व यशवंतराव चव्हाण ज्ञान विज्ञान मंडळ या संस्थांनी त्यांचा गौरव केला आहे.

सरांच्या सुविद्य पत्नी सौ. सुरेखा या प्रियदर्शिनी गर्ल्स हायस्कूल भुईंज येथून ३० वर्षे अध्यापनाचे काम करून नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या विवाहित कन्या डॉ. आकांक्षा एम. डी. एस. पदवीधर असून वाईत दंतवैद्य म्हणून कार्यरत आहेत व चिरंजीव डॉ. सचिन सद्या बेळगांवात एम. डी. एस. चे पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. सेवानिवृत्तीनंतरच्या उर्वरित आयुष्यासाठी डॉ. सावंत यांना सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.सदर कार्यक्रमात डॉ. जयवंत चौधरी, सचिव, प्रा.नारायण चौधरी, खजिनदार जनता शिक्षण संस्था प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. ज्ञानदेव झांबरे, माजी प्रभारी प्राचार्य, डॉ. भालेराव, डॉ. बकरे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत कांबळे,, डॉ. हणमंतराव कणसे, प्रा. भिमराव पटकूरे,प्रा.गणेश चव्हाण, प्रा. विवेक सुपेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ सेक्रेटरी डॉ. अंबादास सकट यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रेश्माबानो मुलाणी व सुमती कांबळे यांनी उत्तम पार पाडले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत ओझर्डेचे पतित पावनचे यश

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : वाई तालुक्यातील पतित पावन विद्यामंदिर ओझर्डे या विद्यालयाला मुख्यमंत्री माझी शाळा ,सुंदर शाळा, उपक्रमशील शाळा. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला महाराष्ट्र शासनामार्फत विद्यालयास दोन लाख रुपयाचे बक्षीस देण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित या विद्यालयमध्ये विविध उपक्रम सामाजिक बांधिलकी व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर हे विद्यालय कार्यरत असून इयत्ता पाचवी ते दहावी माध्यमिक विभागात द्वितीय क्रमांक मिळवून वाई तालुक्यात सातारा जिल्ह्यात व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर मध्ये उपक्रमशील शाळा म्हणून नावारूपाला आलेली आहे . माननीय गटशिक्षणाधिकारी तसेच त्यांचे इतर परीक्षक यांनी केलेल्या परीक्षणानुसार हा क्रमांक विद्यालयाला मिळाला. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गिरीश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व गुरुदेव कार्यकर्ते यांनी हे यश मिळवण्यामध्ये आपला मोलाचा वाटा दिला आहे असे उद्गार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री महेश पिसाळ देशमुख यांनी काढले. यानिमित्त आयोजित केलेल्या आनंद उत्सवामध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व श्री स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा प्रेरणास्थान म्हणून ट्रॅक्टर ट्रॉलीतून सजवून ओझर्डे गावात मिरवणूक काढण्यात आली यावेळी विद्यालयाचा झांज पथक, लेझीम पथक तसेच विद्यार्थ्यांनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, सेवक वर्ग यांना ग्रामस्थांनी फेटे बांधून सन्मान केला. सर्व स्टाफ ने यावेळी ग्रामदैवत पद्मावती माता मंदिर येथे विद्यार्थ्यांचे उपस्थिती दाखवून दर्शन घेतले. यावेळी आजी माजी विद्यार्थ्यांनी यांचेकडून फटाक्यांची आतिषबाजी सुद्धा करण्यात आली. या यशाबद्दल. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य सौ. शुभांगी गावडे. विद्या समिती अध्यक्ष श्री श्रीराम साळुंखे. संस्थेचे सीईओ श्री कौस्तुभ गावडे, संस्थेचे सहसचिव, विभागप्रमुख, सहाय्यक विभागप्रमुख, विविध महाविद्यालयाच्या प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, संघटना पदाधिकारी,यांनी विद्यालयाचे कौतुक करून अभिनंदन केले. त्याचबरोबर शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी शाळा व्यवस्थापन विकास समितीचे सर्व पदाधिकारी शिक्षक पालक संघ माता पालक संघ ग्रामस्थ, तसेच परिसरातील माध्यमिक व प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक गुरुदेव कार्यकर्ते यांनी यांनी विद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. विद्यालयाने सर्वांना पेढे वाटून आपला आनंदोत्सव साजरा केला.

अडेगाव येथील बोधिसत्व विद्यालयात प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन



देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर

देवळी : देवळी तालुक्यातील अडेगाव येथील बोधिसत्व विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून तुकडोजी महाराज संस्थेचे हर्षल भोयर व शैलेश कुंभारे उपस्थित होते. याप्रसंगी बोधिसत्व विद्यालय अडेगाव येथील एकूण बारा विद्यार्थी बक्षीस पात्र ठरले. विद्यार्थ्यांचा मेडल प्रमाणपत्र व शालेय साहित्य वितरित करून गौरव करण्यात आला.

कार्तिक किटे , पियुष पडोळे अश्मिरा हमीद खा पठाण. हे विद्यार्थी विशेष प्राविण्यासह बक्षीस पात्र ठरले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोधिसत्व विद्यालयाचे मुख्याध्यापक मनिष थुल उपस्थित होते. याप्रसंगी संचालन व आभाप्रदर्शन सौ मृणालिनी दातार यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांनी सहकार्य केले.

डॉ. सुनिल दासरे यांनी स्वीकारला पदभार

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : कंधारचे नूतन तालुका आरोग्य अधिकारी म्हणून डॉ. सुनिल दासरे यांनी पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने नूतन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुनिल दासरे यांचा शाल आणि पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

कंधारचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.उमाकांत बिराजदार यांची बदली उमरगा जि.धाराशिव येथे झाली होती. काही महिने तालुका आरोग्य अधिकारी, कंधार या पदाचा अतिरिक्त पदभार देगलुरचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रमेश गवाले यांनी सांभाळला होता. कंधारचे नूतन तालुका आरोग्य अधिकारी म्हणून डॉ.सुनिल दासरे यांनी बुधवारी, २६ मार्च रोजी पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ.सुनिल दासरे यांचा शाल आणि पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ.श्रुती कौरवार, सहाय्यक व्यंकटी शेळके, आरोग्य सहाय्यक बालाजी कल्लाळे, आरोग्य सहाय्यक अविला इंगोल, जी.एस.मलवाडे, लेखापाल राम प्रेमलवाड, काष्टरोग तत्रंज्ञ एकनाथ पठाडे, तालुका समूह संघटक सुशील आलेगावकर, लसीकरण सहनियंत्रक बालाजी काकडे, वरिष्ठ प्रयोगशाळा पर्यवेक्षक सचिन मुंडे, क्षयरोग तंत्रज्ञ दिगंबर मुसळे, डॉ.सुनिल दासरे यांची उपस्थिती होती.

डॉ.सुनिल दासरे हे यापूर्वी अहिल्यानगर येथे वैद्यकीय अधिकारी होते. त्यानंतर अहमदपूर येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून त्यांनी सेवा बजावली. अहमदपूर येथून त्यांची बदली कंधार येथे झाली आहे.

जननायक अभय डी. रंगारी यांना मानवाधिकार भूषण २०२५ पुरस्काराने गौरविणार

भंडारा ■ हंसराज



भंडारा : मानवतावादी विचारांना आदर्श मानून मानवाधिकाराचे रक्षण ,जतन , संवर्धनासाठी विविध जनसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो , राष्ट्रीय पातळीवर देण्यात येणारा हा पुरस्कार सामाजिक , शैक्षणिक , राजकीय , व कलेच्या विविध क्षेत्रातील जनसेवेच्या दखलपात्र आणि अविस्मरणीय कार्य पाहून निवड समितीने या वर्षी चा मानवाधिकार भूषण पुरस्कार २०२५ साठी , कुशल नेतृत्व जननायक लोकगौरव अभय डी रंगारी यांची निवड केली आहे , अभय हे विराट व्यक्तिमत्त्वाचे धनी , कवी , लेखक , मुक्त पत्रकार , समाजसेवक ,प्रभावी वक्ता , समीक्षक , साहित्यिक साहित्यकार , जननायक लोकगौरव , शेतकरी कामगार नेते , राजकीय विश्लेषक , सामाजिक कार्यकर्ते , कुशल संघटक तसेच मानवाधिकाराचे खंदे समर्थक असून , मानवाधिकाराचे रक्षण , जतन ,आणि संवर्धनासाठी आपले आयुष्य खर्ची करत आहेत.

मौलिक अधिकार देशाचे संविधान देतात मात्र मानवाधिकार हे मनुष्य या नात्याने सर्व माणसांना जन्मताच प्राप्त होतात , मानव अधिकाराचा तात्पर्य मानवासाठी आवश्यक अधिकार असतो , अर्थात मानव अधिकार हे वंश ,लिंग ,राष्ट्रीयत्व , वांशिक , भाषा , धर्म ,किंवा इतर कोणत्याही स्थितीची पर्वा न करता सर्व मानवासाठी जन्मजात हक्क आहेत , त्यात जीवन आणि स्वातंत्र्याचा , गुलामगिरी आणि छळापासून स्वातंत्र्य , मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य , काम आणि शिक्षणाचा अधिकार आणि बरेच काही समाविष्ट आहेत , यापैकी कोणत्याही अधिकारावर शासन प्रशासन किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था ने या अधिकाराचे हनन केले त्या त्या वेळी अभय डी रंगारी यांनी याला पुरजोर विरोध करून मानवाधिकाराचे रक्षण जतन संवर्धन केले आहे , त्यांच्या या अविस्मरणीय आणि ऐतिहासिक कार्याबद्दल मानवाधिकार भूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

जनसामान्यांचा असामान्य बुलंद आवाज म्हणून अभय हे परिसरात सुपरिचित आहेत , जनहितार्थ लोकांच्या कोणत्याही समस्या ते कायदेशीर मार्गाने त्वरित सोडवितात , त्यांना या अगोदर राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले , उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे समाजसेवक पुरस्कार , संभाजी नगर (औरंगाबाद)निवड झाली , महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार , १४ एप्रिल २०२५ ला शाहू महाराजांच्या नगरीत कोल्हापूर येते प्रदान करण्यात येणार आहे , मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी मुंबई तर्फे कुशल नेतृत्व जननायक लोकगौरव पुरस्कार आणि मालवा ट्रस्ट मुंबई तर्फे गोल्डन पिकाक अवार्ड मिळाले आहेत , दोन कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

त्यांना मानवाधिकार भूषण २०२५ हा पुरस्कार रविवार दिनांक ०६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ वाजता अमृता लॉन , घुलेवाडी रोड ,पुणे नाशिक हायवे ,संगमनेर जिल्हा नगर, महाराष्ट्र राज्य येथे मानवाधिकार फाऊंडेशन च्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते वितरित होणार आहे , याबद्दल परिसरातील जनतेने त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

विविध स्पर्धा परीक्षांत 'विद्याधाम' च्या विद्यार्थ्यांचे राज्यपातळीवर यश ; वेदांत उदमले - नवोदय निवड, अभिरुप शिष्यवृत्ती व लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात प्रथम

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : शासनमान्य विविध स्पर्धा परीक्षांत येथील विद्याधाम प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राज्यपातळीवर घवघवीत यश संपादन करत राज्यपातळीवर प्रशालेचे नाव दुमदुमत ठेवण्याचे काम केलेले आहे.

प्रशालेतील वेदांत उदमले या विद्यार्थ्याची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली असून या विद्यार्थ्याने राज्यस्तरीय अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षा तसेच 'लक्ष्यवेध' प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यपातळीवर 'प्रथम क्रमांक' प्राप्त केलेला आहे.

अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत (पुंज) प्रशालेतील ९ विद्यार्थी राज्यगुणवत्ता यादीत तर ४ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले आहेत. तसेच लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत प्रशालेचे ६ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आलेले आहेत.

प्रशालेतील विविध स्पर्धा परीक्षातील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे- भारतीय अभिरुप शिष्यवृत्ती परीक्षा(पुंज) इयत्ता पाचवी : वेदांत उदमले (राज्यात प्रथम), हर्षवर्धन बरडे (राज्यात ८ वा) गोरेश दांडेकर ((राज्यात १० वा) राजवर्धन काकडे (राज्यात १५ वा) शरन्या जगदाळे (राज्यात १७ वी) इयत्ता सहावी : विराज शेळके (राज्यात ७ वा), अस्मित गावडे (राज्यात १९ वा), शिव पाचर्णे (राज्यात २१ वा), श्रेया गाडेकर (राज्यात २२ वी)

जिल्हा गुणवत्ता यादीतील विद्यार्थी पुढीलप्रमाणे - मनस्वी जगदाळे (जिल्हयात प्रथम), आर्या नलगे (जिल्हयात प्रथम) शर्वरी औदूतवर, अरविंद जायभाये (जिल्हयात प्रथम), क्षितीज सरोदे, शुभेच्छा गायकवाड (केंद्रात प्रथम) लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षा- वेदांत उद?मले (राज्यात प्रथम) ऋग्वेद सरोदे (राज्यात ३ रा) अमित कारखीले (राज्यात ४ था) गौरेश दांडेकर व अरविंद जायभाये (राज्यात पाचवा) सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष धरमचंदजी फुलफगर प्रशालेचे प्राचार्य गुरुदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक चंद्रकांत देवीकर,मच्छिंद्र बनकर, दिगंबर नाईक,संजयकुमार बनकर तसेच पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष संभाजी दरोडे व सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

तलावाच्या पाण्यामध्ये मृत मासे तरंगत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण; जनावरांना विषबाधा होण्याची दाट शक्यता

सातारा ■ राहुल पवार

सातारा कराड : कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर गाव तलाव मध्ये मृत अवस्थेत मासे तरंगताना सापडत आहेत त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण व जनावरांना व लोकांना विषबाधा होऊ शकते हे मासे तरंगत असल्यामुळे मृत अवस्थेत पाण्याच्या मोठ्या प्रमाणात मृत मासे सापडतात या घटनेमुळे गावात चर्चा सध्या सुरू आहे या ठिकाणी सर्वप्रथम मासे मृता अवस्थेत दिसल्यामुळे तेथील ग्रामस्थ मानसिंग मदने यांनी सांगितले की दोन ते तीन दिवसांपूर्वी या ठिकाणी मृत अवस्थेत मासे सापडत आहेत मृतमासामुळे तलाव परिसर दुर्गंधी पसरली आहे याची माहिती आम्ही ग्रामपंचायत व वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली त्यांनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्षात पाहणी करून पाणी परीक्षण व तपासणीसाठी पाठवले आहे यावेळी मसूर विभाग सहकारी आरोग्य अधिकारी डॉक्टर रूपाली कांबळे समुदाय आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की मृत मासे परीक्षण करून पाणी परीक्षण त्याचे नमुने घेऊन पाणी तपासणीसाठी पाठवले आहे त्याचा अहवाल येईल तेव्हा तो आम्ही सांगू प्राथमिक उपयोजना म्हणून तलाव परिसर स्वच्छ व मृत मासे विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायतींना सूचना दिले आहे व ग्रामस्थ यांना अहवाल येईपर्यंत तलावातील पाणी लोकांनी जनावरासाठी व पिण्यासाठी वापरू नये योग्य ती आरोग्याची आपली व पशु यांची घ्यावी या पाण्याचा पिण्यासाठी वापर करू नये असे आव्हान वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे अहवाल आल्यानंतर त्याची माहिती देऊ असे त्यांनी सांगितले आहे या घटनेसाठीच्या नंतर ग्रामस्थ वैद्य अधिकारी सरपंच यांनी तलावाला भेट देऊन प्रत्यक्षात पाणी करून प्रशासकीय अधिकाऱ्यांना कळविले आहे या तलाव्यामध्ये हंबरवाडी धनगरवाडी योजनेतून मध्यंतरी पाणी सोडले होते त्यामुळे जवळजवळ ४० ते ५० टक्के पाणी शिल्लक आहे पण तलाव्याची पातळी खालवली आहे १९७२ ला दुष्काळ याला सुद्धा याचा तलावाने गावाला नवसंजीवनी देऊन पिण्याचे पाण्याची टंचाई पासून थोडासा दिलासा दिला होता असे काही जुने जाणकार नागरिक सांगत आहेत तलाव्यावर अनेक विहिरी अवलंबून आहेत या ठिकाणी गावची या पिण्याची पाण्याची विहीर ही तलाव यावरच अवलंबून आहे त्यामुळे प्रशासनाने यावर लवकर उपाययोजना करावी अशी माहिती सरपंच भीमराव मदने यांनी दिली आहे तलाव परिसरात ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती यावेळी सरपंच भीमराव मदने संभाजी पवार. मानसिंग मदने अमित पवार शहाजी मदने धनाजी मदने अमोल पवार पिंटू शेवाळे सुरेश पाटील आरोग्य सेवक खेडकर यु. एम. गणेश लेंडवे यांचे घटनास्थळी उपस्थिती होती.

दोन महिन्यात राज्याचे नाट्यगृहधोरण आणणार : सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार

देवळी येथील नाट्यगृहाचे लोकार्पण

वर्धा ■ प्रतिनिधी





वर्धा : महाराष्ट्र हे कलासंपन्न राज्य असून नाटक हा कलाविष्कार येथे जोपासल्या जातो. नाट्य संस्कृतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. असे असतांना नाट्यगृह कसे असावे, कलावंतांना व प्रेक्षकांना काय सुविधा असाव्यात याबाबतीतील सर्वंकष नाट्यगृह धोरण येत्या दोन महिन्यात तयार करण्यात येईल अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी आज केली. या धोरणाच्या आधारेच यापुढे राज्यातील सर्व नाट्यगृहाची निर्मिती करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

नगर परिषद देवळीच्या वतीने बांधण्यात आलेल्या राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाचे लोकार्पण व विविध विकास कामाच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे गृह (ग्रामिण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाने, वरुडचे आमदार चंदू यावलकर, माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., सुनील गफाट, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, तहसीलदार मलिक विराणी, मुख्याधिकारी विजय आश्रमा, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वैशाली येरावार, शोभा तडस आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राची १८२३ पासुनची कलासंस्कृतीची परंपरा असून या कला संस्कृतीचे जतन जपणूक करणे महत्वाचे आहे. यासाठी राज्य शासन रस्ते, आरोग्य, शिक्षण, पाणी महिलासाठी विविध कल्याणकारी योजनांसोबतच राज्यातील कलाकारांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना आर्थिक संपन्न करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे आशिष शेलार म्हणाले. या नाट्यगह्रातून वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन होऊन नगर पालिकेला उत्पन्नाचे साधन निर्माण होईल अशा आशावाद त्यांनी यावेळी केला. शासकीय विविध कार्यक्रमासाठी या नाट्यगृहाचा वापर व्हावा यासाठी अशा सुचनाही यावेळी आशिष शेलार यांनी दिल्या.

सांस्कृतिक कार्य मंत्री झाल्यानंतर नाट्यगृहाचे हे पहिलेच लोकार्पण असल्याचे सांगून आशिष शेलार म्हणाले की, देवळी येथील नाट्यगृह अतिशय देखणे आहे. या नाट्यगृहात राज्य व देशपातळीवर नाव लौकिक करणारे कलावंत निर्माण होतील. असेही आशिष शेलार म्हणाले.

जिल्ह्यातील देवळी ही क वर्ग दर्जाची नगर पालिका असतांना सुध्दा ईनडोअर स्टेडीअम, अत्याधुनिक नाट्यगृहाची निर्मिती सोबतच विविध विकास कामे नगर परिषदेच्यावतीने करण्यात आले आहे. ही देवळी नगर परिषेदेसाठी भुषणावह बाब आहे. देवळीच्या विकासासाठी राज्य शासनाच्यावतीने निधीची कमी पडू देणार नाही असे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले.

देवळी हे महामार्गाला जोडलेले शहर असल्यामुळे येथे दळणवळणाच्या पर्याप्त प्रमाणात सुविधा उपलब्ध असून येथील रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार असल्याचे आ. राजेश बकाने म्हणाले. देवळी मतदार संघांतर्गत येणा-या वर्धा तालुक्यातील सेवाग्राम येथे सांस्कृतिक भवन व पत्रकार भवनाची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा त्यांनी योवळी केली.

हिंगणघाट येथे सांस्कृतिक भवनासाठी १७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून जागेअभावी सांस्कृतिकभवनाचा प्रस्ताव तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित असल्याने यावर शासनस्तरावर प्रयत्न करावा असे आ. समिर कुणावार म्हणाले.

देवळी येथे चांगले खेळाडू व कलाकार निर्माण होण्यासाठी स्टेडीअम सोबतच नाट्यगृहाची निर्मिती करण्यात आली असून येथील कलागुणांना वाव मिळेल. आर्वी येथील सांस्कृतिक भवन करीता निधी मंजूर झाला असून जागेच्या प्रशासकीय कामाच्या अडचणीमुळे प्रस्ताव प्रलंबित असल्याची खंत यावेळी आ. दादाराव केचे यांनी व्यक्त केली.

या नाटयगृहामुळे येथील कलाकाराच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबत व्यावसायिक दृष्टया नगरपालिकेला एक उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. देवळी मध्ये खेळाडूसाठी इडोअर स्टेडीअमची निर्मिती करण्यात आली असून खेळाडूंच्या निवासासाठी वसतिगृह बांधकामासाठी निधी उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा यावेळी रामदास तडस यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजना अनुदान अंतर्गत सन २०१५-१६ वर्षात मंजूर झालेल्या राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह लोकार्पण व ८ कोटी ५० लक्ष रुपये किमतीच्या विविध विकास कामाचे भूमिपूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. ६०० आसन क्षमता असलेल्या या नाट्यगृहाचे बांधकाम १२ कोटी रुपये खर्च करून करण्यात आले आहे.

यावेळी मंत्री महोदयाचे हस्ते नाट्य चळवळीत योगदान देणा-या, कलाकार, साहित्यकारांचा तसेच भजनी मंडळींना टाळचे वितरण करण्यता आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयकुमार आश्रमा यांनी तर संचालन ज्योती भगत यांनी केले कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

११६८ मतदार बजावणार मतदानाचा हक्क
निवडणूक महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीचा महत्वाचा भाग म्हणून ३ एप्रिलला प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणूक प्रक्रियेदरम्यान जिल्ह्यातील १ हजार १६८ मतदार प्रत्यक्ष मतदान करून मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदे निवडणुकीच्या रिंगणात एकूण ४१ उमेदवार असून नऊ उमेदवार निवडून द्यायचे आहेत. गुरूवार ३ एप्रिलला सकाळी ८ ते दुपारी ५ यावेळेत प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया होणार आहे. रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र खोली क्रमांक १ व खोली क्रमांक २ असे दोन मतदान केंद्रांवरून प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही या हेतून मतदानासाठी येणा-यांकरिता जुनी जिल्हा परिषद कार्यालय इमारत परिसर वाहनतळ म्हणून देण्यात आले आहे. प्रत्यक्ष मतदानाच्यावेळी मतदाराची ओळख पटावी म्हणून मतदारांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र किंवा सक्षम अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणावे. मतदारांनीही मोठ्या संख्येने मतदान करावे असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे.

लहान आर्वी शक्तीकेंद्रातील तीन्ही बुथ समित्यांची निवड
भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ होले यांची प्रमुख उपस्थिती

लहान आर्वी ■ सुनिल साबळे









लहान आर्वी : महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे वतीने राबविण्यात येत असलेल्या संघटन पर्वाच्या धरतीवर वर्धा जिल्हा भाजपाचे आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व मंडळांमध्ये शक्तीकेंद्रातील विविध बुथ निहाय बुथ समित्यांची निवड करण्यात येत आहे.याच अनुषंगाने आष्टी मंडळातील लहान आर्वी शक्तीकेंद्रातील लहान आर्वी येथील दोन बुथ आणि जैतापुर येथील एक बुथ अशा तिन्ही बुथ समित्यांची निवड भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ होले यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच करण्यात आली. यामध्ये लहान आर्वी बुथ क्रमांक २२ चे बुथ अध्यक्षपदी लहान आर्वी ग्रामपंचायतचे उपसरपंच अमोल लक्ष्मणराव होले तर लहान आर्वी बुथ क्रमांक २३ चे बुथअध्यक्षपदी युवा मोर्चाचे सक्रिय कार्यकर्ते हर्षल रामदास भोकरे आणि जैतापुर येथील बुथ क्रमांक २४ चे बुथ अध्यक्षपदी गजानन महादेवराव खराबे यांची सर्वानुमते बींनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी लहान आर्वी पंचायत समितीचे माजी पं. स. सदस्य देवानंदभाऊ डोळस, भाजपा ओबीसी आघाडीचे तालुकाध्यक्ष तथा लहान आर्वी येथील सरपंच सुनिलभाऊ साबळे, जैतापुरचे माजी सरपंच मेघराजभाऊ देशमुख,जैतापुरचे माजी सरपंच गंगाधरराव मडावी,सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष हरीदास राऊत,लहान आर्वी जि.प. सर्कल प्रमुख राजेशभाऊ ठाकरे,शक्तीकेंन्द्र प्रमुख अनिलभाऊ गायकी,मावळते बुथ प्रमुख दिलीपभाऊ होले, मावळते बुथ प्रमुख हनुमंतराव गायकी, जेष्ठ नेते बाबारावजी उमप, माजी बुथ प्रमुख ज्ञानेश्वर मेंढे यांच्या सह सर्व कार्यकर्ते महीला भगिनी उपस्थितीत होते.

प्रोवेदा इंडिया आणि ग्रामपंचायत निर्वी यांच्या
संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



शिरुर (पुणे) ■ शकील मनियार

शिरूरः निर्वी ता.शिरूर जि. पुणे.वार सोमवार दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी सकाळी ९:०० ते सायं. ५:०० या कालावधीत प्रोवेदा इंडिया व ग्रामपंचायत निर्वी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जापानीज टेक्नॉलॉजी मशीनच्या माध्यमातून शरीरातील ४२ अवयवांची तपासणी करण्यात आली यावेळी १५२ लोकांची तपासणी करण्यात आली.

या कॅम्पमध्ये कंपनीच्या तज्ञ आरोग्य सल्लागारांकडून ग्रामस्थांना आरोग्य विषयक अतिशय महत्त्वाचे मार्गदर्शन करण्यात आले व आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यायची याविषयी अतिशय महत्त्वाचा सल्ला देण्यात आला.

निर्वी ग्रामपंचायतच्या सहकार्याने हे आरोग्य शिबिर संपन्न झाले.

प्रहार' काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख पदी दिनेश निंबाळकर ; पक्ष प्रमुख बच्चु कडू यांनी केली नियुक्ती

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल नरखेड विधानसभा क्षेत्र प्रहार संघटनेचे प्रमुख पदी काटोल येथील युवा दिनेश निंबाळकर यांची पक्ष प्रमुख बच्चूकडू यांनी नियुक्ती करून प्रमाणपत्र आयोजित कार्यक्रमात दिले आहे. कुरळपूर्णा (ता. चांदूर बाजार) येथे झालेल्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय संवाद बैठकीत प्रहारचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री तथा माजी आ. बच्चु कडू यांनी दिनेश निंबाळकर यांची नियुक्ती केली. यावेळी काटोल तालुका प्रमुख पदी धिरज मांदळे,काटोल शहर प्रमुख पदी विजय कठाणे यांना सुद्धा नियुक्ती पत्र देऊन सर्वांचे अभिनंदन केले.यावेळी नागपूर जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) रमेश कारेमोरे, विदर्भ संघटक गजु कुबडे, सदस्य विजय ठाकरे, मनीष देशमुख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विधानसभा क्षेत्रातील समस्या सोडविणार - दिनेश निंबाळकर

प्रहार पक्षाने मोठी जबाबदारी दिलीआहे. सर्वांचे सहकार्याने नक्की समस्या सोडीण्याचा पूर्ण प्रयत्न करेल असा विश्वास निंबाळकर यांनी व्यक्त केला.

यावेळी बच्चु कडू यांनी काटोल नरखेड तालुक्यातील सामान्य माणसांच्या ज्वलंत प्रश्नांना योग्य न्याय दिनेश निंबाळकर हे देतील असा आशावाद उपस्थितकडून व्यक्त केला.

विधानसभा क्षेत्रातील प्रश्न.....

विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, कामगार, शेतमजूर आणि दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना प्राधान्याने सोडविणार असल्याचे मत नवनियुक्त विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर यांनी व्यक्त केले.

जिल्हा वार्षिक योजनेचा शंभर टक्के निधी खर्च

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अंतर्गत जिल्ह्याकरिता शासनाकडून एकूण ३१३.०० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. १०० टक्के निधी जिल्ह्यास शासनाकडून प्राप्त झाला असून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, यांच्या मार्गदर्शनात सर्व यंत्रणांनी शंभर टक्के निधी खर्च केला आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अंतर्गत जिल्ह्याकरिता शासनाकडून एकूण ३१३.०० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. सदर निधी पैकी प्रथम टप्पा माहे जुन, २०२४ मध्ये एकूण मंजूर तरतुदीच्या ३३ टक्के म्हणजेच रु.१०४.२२ कोटी, तद्नंतर सप्टेंबर, २०२४ ला मंजूर तरतुदीच्या ४० टक्के, नोव्हेंबर, २०२४ मध्ये ६० टक्के, जानेवारी, २०२५ मध्ये ८० व १०० टक्के निधी जिल्ह्यास शासनाकडून प्राप्त झाला.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, यांच्या अध्यक्षतेखाली ३० जानेवारी, २०२५ रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेण्यात आली त्यामध्ये शिल्लक निधीतून विविध योजनाअंतर्गत कामाचे नियोजनास मान्यता प्रदान करण्यात आली.

पालकमंत्री डॉ भोयर यांच्या सुयोग्य नियोजन व मार्गदर्शनामुळे तसेच सातत्याने आढावा घेवून १०० टक्के निधी खर्च होण्याच्या दृष्टीने निर्देश दिले तसेच जिल्हाधिकारी वान्मथी सी., यांनी खर्चाचे सुक्ष्म नियोजन केल्यामुळे सर्व यंत्रणांनी विहित वेळेत प्रस्ताव सादर केले. तसेच ज्या यंत्रणांचा निधी खर्च होवू शकत नव्हता त्या यंत्रणांनी सुध्दा विहित वेळेत अहवाल सादर केल्यामुळे सदर निधीचे योग्य नियोजन केले. त्यामुळेच विहित कालावधीत १०० टक्के निधी खर्च झाला.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ अंतर्गत विकास क्षेत्रानिहाय उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे विवरण खालिलप्रमाणे आहे. (रुपये लाखात) विकास क्षेत्र -उपलब्ध करुन देण्यात आलेला कृषि व संलग्न सेवा २८०९.८०, ग्रामविकास ४९०५.७२, सामाजिक व सामुहिक सेवा १०५५१.८२, पाटबंधारे व पुरनियंत्रण २०३२.७९, ऊर्जा १३६३.३५, उद्योग व वस्त्रोद्योग २६.३०, परिवहन ३८२३.०७, सामान्य सेवा ३२५९.७६, सामान्य आर्थिक सेवा १७५९.८९, इतर कार्यक्रम ७६७.५० असा एकूण ३१३००.०० निधी उपलब्ध करून देण्यात आला.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत जिल्ह्याकरिता शासनाकडून एकूण ४४.०० कोटी निधी प्राप्त झाला असून १०० टक्के खर्च करण्यात आला. तसेच आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत १७.४६ कोटी निधी प्राप्त झाला असून १०० टक्के खर्च करण्यात आला.

जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत माहे डिसेंबर २४ अखेर रु. १० टक्के होता. मा.पालकमंत्री महोदय यांचे मार्गदर्शन व सर्व लोकप्रतिनिधी यांच्या सहकार्यामुळे ३१ मार्च पूर्वी १०० टक्के निधी खर्च करण्यात आला.

जिल्हाधिकारी वान्मथी सी., पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे मार्गदर्शन व जिल्हाधिकारी वान्मथी सी., यांच्या योग्य नियोजनामुळे जिल्हा वार्षिक योजनेचा निधी शंभर टक्के खर्च झाला आहे. सर्व कार्यान्वित यंत्रणांनी सुध्दा वेळेत निधी खर्च होईल यासाठी नियोजन केले.

अनिरुद्ध राजूरकवार
जिल्हा नियोजन अधिकारी, वर्धा

डायट इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करा : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

जिल्हा नियोजनमधून निधी देणार; डायट इमारतीची पाहणी

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा या संस्थेच्या ऐतिहासिक इमारतीची पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पाहणी करून इमारतीच्या दुरुस्ती व डागडुजीसाठी अंदाजपत्रक तयार करून घ्यावे व त्याकरिता जिल्हा नियोजन मधून निधी देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

तसेच सदर ऐतिहासिक वास्तूच्या आवारात नवीन एक्सलन्स डाएट वर्धाची इमारत न बांधता समोरील रस्त्याच्या पलीकडे डाएट, वर्धाच्या स्वमालकीच्या जागेत सदरचे बांधकाम करण्यात यावे अशी सूचना त्यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे आदी उपस्थित होते.

डॉ. पंकज भोयर यांनी विजेत्या सर्व स्पर्धकाचे अभिनंदन केले. एनईपी २०२० नुसार येत्या शैक्षणिक वर्षात सर्वांना काम करावयाचे आहे, असे सांगितले. पीएमश्री शाळा, आदर्श शाळा, मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा व सीएम शाळा यांनी तालुक्यात मॉडेल स्कूल म्हणून काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली. जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभ्यास दौरे आयोजित करावेत त्यासाठी डीपीडीसी मधून निधी देण्याचे त्यानी आश्वासन दिले.

नारा येथे श्री संत सखूमाऊली प्रगट दिन उत्सवाला सुरुवात

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर

कारंजा घाडगे : कारंजा तालुक्यातील नारा येथे दरवर्षीप्रमाणे दिनांक २ एप्रिल ते ९ एप्रिल २०२५ पर्यंत श्री संत सखू माऊली ३५ वा प्रगट दिन उत्सवाला सुरुवात दिनांक २/४/ २०२५ पासून योग व प्राणायाम त्याचप्रमाणे श्रीमद् भागवत पुराण कथा ज्ञानयज्ञ ह. भ. प. विलास महाराज शास्त्री वाघमारे ऋषिकेश हल्ली मुक्काम खामगाव यांचे संगीतमय भागवत पुराण कथा ज्ञान यज्ञ आयोजित केले आहे.

७/४/ २०२५ रोज सोमवारला बारा चार वाजेपर्यंत निशुल्क नेत्र चिकित्सा व नेत्र तपासणी शिबिर डॉक्टर शुक्ला विभाग प्रमुख दिन व तज्ञ डॉक्टर कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम यांच्या सौजन्याने व धर्मदाय आयुक्त कार्यालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमानाने शिबिराचे आयोजन केलेले आहे भक्तांनी याचा लाभ घ्यावा याचे आव्हान देवस्थानाच्या वतीने करण्यात आले आहे.

दिनांक ८/४/२०२५ मंगळवार ला सायंकाळी चार वाजता श्री सती अनुसयामाता यांचा पालखी सोहळा व श्री संत सखू माऊली यांची भव्य शोभायात्रा निघणार आहे या शोभायात्रा नंतर रात्री आठ वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प पवन पाल महाराज वडाळीकर सत्यपाल महाराजांचे शिष्य यांचे कीर्तनाचे आयोजन केलेले आहे दिनांक ९ /४ /२०२५ ला गोपाल काल्याचे किर्तन सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प विलास महाराज शास्त्री वाघमारे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

दिनांक ९/४/ २०२४ ला प्रगट दिन उत्सानिमित्य विशेष अतिथी म्हणून माननीय अमरभाऊ काळे खासदार वर्धा लोकसभा डॉ पंकज भोयर राज्यमंत्री व पालकमंत्री वर्धा सुमित दादा वानखडे आमदार आर्वी विधानसभा दादाराव केचे आमदार विधान परिषद सुधीरजी दिवे सल्लागार सूक्ष्म लघु मध्यम उद्योग नवी दिल्ली मनोज हिरुडकर गटविकास अधिकारी सावनेर सौ सरिता गाखरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वर्धा श्री संत सचिन देव महाराज अमरावती एडवोकेट विलासराव खरात मराठवाडा धर्मदाय वकील संघ औरंगाबाद सो अर्चना विनायक डेहणकर माजी महापौर नागपूर यांच्या उपस्थितीत प्रगट दिन उत्सव आयोजित केलेला आहे या प्रगट दिन उत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत सखु माता देवस्थान विश्वस्त मंडळ तसेच नारा ग्रामवासी यांनी केलेला आहे

९/४/ २०२५ ला महाप्रसाद दुपारी दोन वाजेपासून सुरू होणार आहे तरी नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विश्वस्त मंडळ सखू माता देवस्थान नारा समस्त ग्रामवासी यांनी आव्हान केले आहे.

पाटण तालुक्यात महसूल विभागाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाला दमदार सुरुवात : सुरेश संकपाळ पाटण

सातारा पाटण ■ प्रतिनिधी



सातारा पाटण :- महाराष्ट्र शासनाने सर्व विभागामार्फत राज्यामध्ये नागरिक, जनता यांची कामे वेळेत व जलद होऊन त्यांचे आयुष्य सुकर होण्यासाठी १०० दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. त्यानुसार पाटणच्या महसूल विभागामार्फत नागरिक, शेतकरी यांच्या हक्काचे लाभ त्यांना जलद देणेसाठी नियोजन करून कार्यवाही केली आहे. यानिमित्ताने पाटण तालुक्यात महसूल विभागाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाला प्रांताधिकारी सोपान टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली दमदार सुरुवात झाली आहे. असे तहसिलदार अनंत गुरव यांनी सांगितले.

पाटण तालुक्यात १ लाख ५७ हजार ५५१ शेतकरी आहेत. शेतकरी यांची ७/१२ विषयक कामे यामध्ये प्राधान्याने घेणेत आली आहेत. वारस नोंदी, ए. कू. मॅ., नोंदी, अपाक नोंदी, तुकडा नोंदी कमी करणे, लक्ष्मी मुक्ती योजना, पाणंद व शेत रस्ते अतिक्रमण मुक्त करणे या कामाच्या माध्यमातून शेतकरी यांचे कामे पूर्ण करून त्यांना दिलासा दिला जात आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या साठी सुरु असलेली सामाजिक अर्थ साहाय्य योजना अंतर्गत विधवा, वृद्ध, निराधार, दिव्यांग बांधव यांचेप्रस्ताव मंजुरी करून त्यांच्या आयुष्याला आर्थिक हातभार लावून त्याचे जीवनमान उंचावणे. विध्यार्थी यांना शाळा व नोकरीसाठी लागणारे दाखले वाटप करणे असे सर्व घटकांना समविष्ठ करून १०० दिवसीय कार्यक्रम मध्ये नागरिकांना लाभ मंजूर करनेत आले आहेत.

या १०० दिवसीय कार्यक्रमात वारसा नोंदी मंजुर संख्या- ८३८, सातबारा संख्या- ६९०३, लाभार्थी संख्या- २८२९, तुकडा नोंद कमी गट संख्या- १३७७०, लाभार्थी शेतकरी संख्या- ५४,३५०, ए. कू. मॅ. नोंद कमी संख्या- ४५९, लाभार्थी शेतकरी संख्या- १९२५, लक्ष्मी मुक्ती योजना संख्या- ४५ महिलांची नावे सातबारा ला लावली, अपाक नोंद संख्या- ५२९, लाभार्थी संख्या- ५२९, पाणंदअतिक्रमण मुक्त करणे-पाणंद संख्या- २३, शेतकरी लाभार्थी- २१४६, सामाजिक अर्थ साहाय्य योजना (संजय गांधी योजना) मंजूर प्रकरणे - ३२३, पी.एम. किसान लँड सीडींग लाभार्थी संख्या- ३८४, पुनर्वसन गावठाण प्लॉट वर्ग १ करणे लाभार्थी - २५७, अग्रीस्टॅग फार्मर आयडी संख्या- ५१३९०, भूकंप ग्रस्त दाखले संख्या - ५९सदर कार्यक्रम यशस्वी करणे साठी तहसील कार्यालय मधील सर्व अधिकारी, कर्मचारी, विशेषतः मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक यांनी खूप परिश्रम घेतले. यापुढे ही जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण, नागेश पाटील, उपविभागीय अधिकारी सोपान टोम्पे यांचे मार्गदर्शनाखाली प्रलंबित कामे पूर्ण केली जाणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दाखल्यांसाठी अशीच तत्परता हवी- लक्ष्मण चव्हाण

महाराष्ट्र शासनाने महसूल विभागाकडून सुलभता मिळावी व नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी १०० दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. याच पद्धतीने विद्यार्थांना त्यांच्या शैक्षणिक दाखल्यांच्या कामात सुलभता व सुकरता यावी. यासाठी पाटण महसूल विभागाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक अथवा नोकरीच्या कामासाठी त्यांचे जातीचे दाखले, भुकंपग्रस्त दाखले, अल्पभूधारक दाखले आदी दाखले वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. अलिकडे अनेक दाखल्यांवर नियमबाह्य त्रुटी काढण्याचे प्रमाण वाढले आहे. संबंधित महसूल कर्मचारी, अधिकारी यांच्यासमोर दाखल्यांची प्रकरणे अनेक दिवस पडून असतात. यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर दाखले मिळत नाहीत. यासंदर्भात संबंधितांना विचारले असता आमच्या पुढे ऐवढेच काम नाही असे उद्धट पणाने सांगितले जाते. हे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांना प्राधान्य देवून त्यांचे दाखले वेळेत व पहिल्यासारखे सुलभतेने द्यावेत ही अपेक्षा पाटण च्या महसूल विभागाकडे आहे. असे सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण चव्हाण यांनी सांगितले.

श्री स.भु.गोंदेगाव,येथे संस्था स्थापनादिन साजरा



दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे

सोयगाव : श्री सरस्वती भुवन प्रशाला, गोंदेगाव श्री स.भु.शिक्षणसंस्था,छ.संभाजीनगर सन १९१५ 'गुढीपाडवा' या शुभ मुहूर्तावर संस्था स्थापनादिनी संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण समारंभ साजरा करण्यात आला.या प्रसंगी श्री सरस्वतीमाता कै.गोविंदभाई श्रॉफ कै.भाऊसाहेब वैशंपायन यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शालेय समिती अध्यक्ष श्री स.भु.शिक्षणसंस्था छ.संभाजीनगरचे संचालक डॉ.योगेश इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.व संस्था गीत सादर केले.ध्वजारोहणानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक प्राचार्य रमेश माळी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या पूर्वइतिहास ते आजपर्यंतच्या विकासाचे टप्पे सविस्तर सांगितले.उपमुख्याध्यापक संजय दाभाडे यांनी आपण श्री स.भु.शिक्षणसंस्थेचे एक भाग आहोत ही अभिमानास्पद बाब आहे असे सांगितले.डॉ.योगेश इंगळे यांनी खडतर परिस्थितीत श्री स.भु.संस्था उभी राहिली ती स्पर्धेच्या युगात टिकवून रहावी यासाठी संस्थेचे घटक म्हणून प्रयत्नशील असावे असे मत व्यक्त करून. या प्रसंगी शालेय समिती सदस्य सुधाकर महालपुरे, भागवत महालपुरे, शरद निकम, मुख्याध्यापक आर.एस.माळी, उपमुख्याध्यापक एस. आर. दाभाडे, पर्यवेक्षक जी.जी.ढाकणे, प्राथ. मुख्याध्यापिका अनिता वाघ ,प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सहकारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.बी.पाटील यांनी केले.तर आर.बी.राठोड यांनी आभार मानले.

संत तुकाराम साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा : आमदार सुनील शेळके

पुणे ■ प्रतिनिधी



तळेगाव दाभाडे (मावळ/पुणे) : 'संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी प्रयत्नशील राहू. शेतकऱ्यांना अधिक चांगला ऊस दर मिळावा, पारदर्शक कारभार व्हावा, तसेच कारखान्याच्या माध्यमातून शैक्षणिक आणि औद्योगिक प्रगती साधावी,' असे प्रतिपादन आमदार सुनील शेळके यांनी केले.

श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या सार्वत्रिक निवडणूक प्रचारार्थ आयोजित महायुती मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी बिनविरोध निवड झालेल्या संचालकांचा सत्कार करण्यात आला. वडगाव मावळ शासकीय विश्रामगृहाच्या आवारात महायुतीच्या वतीने आयोजित या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, आरपीआय, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष व मित्रपक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला आमदार सुनील शेळके, आरपीआय नेते सूर्यकांत वाघमारे, भाजपचे ज्येष्ठ नेते भास्करराव म्हाळसकर, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रमेश साळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, शिवसेना तालुकाप्रमुख राजू खांडभोर, विठ्ठल शिंदे, सुरेश चौधरी, संतोष दाभाडे, भरत येवले, दीपक हुलावळे, कृष्णा कारके, नारायण ठाकर, बाबूलाल नालबंद, शरद हुलावळे, अरुण लाड, विलास बडेकर, बबनराव ओव्हाळ, देविदास कडू, महादूबुवा कालेकर, रामनाथ वारिंगे, सुनील ढोरे, नामदेव घुले, काळूराम मालपोटे, मारुती देशमुख, दिपाली गराडे, माऊली ठाकर, तुकाराम आसवले, संभाजी शिंदे, राजू चव्हाण, उमा मेहता, आरोही तळेगावकर उपस्थित होते. तसेच संचालकपदी बिनविरोध निवड झालेल्या माऊली दाभाडे, हभप छबन महाराज कडू, लक्ष्मण भालेराव, उमेश बोडके, भरत लिम्हण, संदीप काशीद, शोभाताई वाघोले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याशिवाय निवडणुकीतील उमेदवार चेतन भुजबळ यांनाही शुभेच्छा देण्यात आल्या.

आमदार शेळके यांच्या रोजगार हमी योजना समितीच्या प्रमुखपदाच्या निवडीबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आमदार सुनील शेळके यांनी पॅनलच्या विजयासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे सांगत, 'महायुती सरकारच्या पाठिंब्याने हा पॅनल निवडून आला आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पारदर्शक कारभार करा. खर्च न करता संचालक झालात, त्यामुळे अधिक जबाबदारीने काम करा,' असे ते म्हणाले.

'आपल्याकडे पुढारी कमी आणि पदे जास्त आहेत. त्यामुळे शासकीय समित्या व अन्य पदांवर सर्वांना संधी मिळेल. पुरुषांप्रमाणेच महिलांनाही योग्य सन्मान मिळेल,' अशी ग्वाही आमदार शेळके यांनी दिली.

यावेळी त्यांनी जातीपातीवर आधारित राजकारण टाळण्याचे आवाहन केले. 'विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जावे लागेल. पुरुषांप्रमाणेच महिलांनाही सन्मान मिळेल,' असे ते म्हणाले. शेवटी त्यांनी, 'वेळ पडल्यास लोकहितासाठी मोर्चा काढावा लागला तरी मागे हटणार नाही,' असा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गणेश खांडगे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख राजू खांडभोर यांनी शिवसेना कार्यकर्त्यांना अधिक संधी मिळावी, अशी मागणी केली. रमेश साळवे यांनी मावळ तालुक्याला भविष्यात मंत्रिपद मिळावे, अशी इच्छा व्यक्त केली. भास्करराव म्हाळसकर यांनी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

सूर्यकांत वाघमारे यांनी कारखान्याच्या माध्यमातून मेडिकल व इंजिनिअरिंग कॉलेज स्थापन करून तालुक्याच्या प्रगतीस चालना द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. माऊली दाभाडे यांनी शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून सुविधा पुरविल्या जातील, असे सांगितले. कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष विदुरा नवले यांच्यासह पॅनेलच्या उर्वरित तिन्ही उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्याचे निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

ग्रामपंचायत शिक्रापूर वाचनालयास कर्तव्य फाउंडेशन तर्फे पुस्तक संच भेट ;श्री.तुषार आळंदीकर यांच्याकडून सलग पाच वर्ष स्वखर्चाने वाचनालयास दहा सभासद!!



शिक्रापूर ■ प्रतिनिधी

शिक्रापूर : शिक्रापूर येथील सामाजिक कार्यकर्त्या व कर्तव्य फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. मनीषाताई रमेश गडदे यांनी स्वखर्चाने गावातील शासनमान्य भैरवनाथ मोफत वाचनालय ग्रामपंचायत शिक्रापूर येथे एक पुस्तक संच भेट दिला आहे. ग्रंथपाल संतोष काळे यांनी पाच वर्षांपूर्वी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शिक्रापूर येथील युवा उद्योजक यांनी स्वखर्चाने वाचनालयास दहा सभासद दिलेले असून गेली पाच वर्ष अखंडपणे स्वखर्चाने वाचनालयास सभासद जोडण्याचा अनोखा उपक्रम तुषार आळंदीकर करत असून या उपक्रमाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामविकास अधिकारी यांनी विशेष कौतुक केले.

याप्रसंगी श्री रमेशराव गडदे आदर्श सरपंच ग्रामपंचायत शिक्रापूर श्री शिवाजी शिंदे (ग्रामपंचायत अधिकारी) , श्री संतोष काळे पा. (आदर्श ग्रंथपाल ग्रामपंचायत शिक्रापूर.),श्री प्रकाश वाबळे (ग्रामपंचायत सदस्य)श्री त्रिनयन कळमकर (ग्रामपंचायत सदस्य) श्री अशोक जाधव (कृषी सहाय्यक अधिकारी शिक्रापूर)

,श्री तुषार आळंदीकर,श्री हनुमंत मासळकर, श्री चंद्रकांत खेडकर, श्री बबनराव मांढरे , ग्रामपंचायत कर्मचारी अनंता दरवडे आदी वाचनालय सभासद व मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथ स्वीकारले. वाचनाची प्रचंड आवड असल्याने व वाचन चळवळ वृद्धिंगत व्हावी तसेच वाचन संस्कृती रुजविण्यासाठी कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने आपल्या ग्रंथालयास ग्रंथ भेट देत असल्याचे सौ. गडदे यांनी सांगितले. तसेच आळंदीकर यांनी यापुढेही हा उपक्रम सातत्याने चालू ठेवणार असल्याचे यावेळी सांगितले.

येथील सुसज्ज व भरपूर ग्रंथसाठा उपलब्ध असलेले व उत्तम व्यवस्थापन व येथील कामाचे समाधान व्यक्त करत सौ मनिषा गडदे यांनी ग्रंथपाल संतोष काळे पाटील यांचे विशेष कौतुक केले .तसेच वाचनालयाच्या उज्वल भविष्यासाठी सदिच्छा शुभेच्छा दिल्या .यावेळी स्वयंस्फूर्तीने ज्या नागरिकांना उत्तम दर्जाचे ग्रंथ भेट द्यावयाचे असतील त्यांनी ग्रामपंचायत वाचनालय शिक्रापूर येथे संपर्क करण्याचे आवाहन आदर्श ग्रंथपाल संतोष काळे पाटील यांनी केले आहे. यावेळी सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

माणुसकी फाउंडेशन च्या वतीने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणीः पूर्णा ,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित टेनिस बॉल स्पर्धेत ताज फाउंडेशन क्रिकेट क्लब विजेता तर सँडी इलेव्हन हा संघ उपविजेता ठरला आहे.

येथील ऐतिहासिक आर आर सी मैदानावर माणूसकी फाउंडेशन च्या वतीने टेनिस बॉल क्रिकेटच्या स्पर्धा घेण्यात आल्या . अंतिम सामन्याचे उद्घाटन जगदीश जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आले. अंपायर म्हणून नितेश जोंधळे, व माधव अंभोरे यांनी काम पाहिले. या सामन्यानंतर पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर मुकुंद भोळे, जगदीश जोगदंड, संजय जल्लारे, चक्रवती वाघमारे, तुषार गायकवाड, राजकुमार सूर्यवंशी, साहेबराव सोनवणे, सुरेंद्र नरवाडे, गजानन सरोदे, कुंदन ठाकूर, रवी गायकवाड, शत्रु भोळे आयोजक साकेत ऊर्फ सोनुभाऊ कांबळे आदी उपस्थित होते. यावेळी विजेत्या संघाला चषक रोख पारितोषिक व उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना वैयक्तिक पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. प्रमुख उपस्थितात प्रशांत जावळे, जयकांत कांबळे, धैर्यशील जोंधळे, कृष्णा वाघमारे, वैभव काळे, सिद्धांत सोनकांबळे, सचिन कांबळे विशाल कांबळे यांचा समावेश होता स्पर्धेचे प्रायोजक रवी कांबळे, मिलिंद कांबळे, मुकुंद भोळे होते. आयोजक साकेत ऊर्फ सोनुभाऊ कांबळे यांनी प्रास्ताविक करून सर्वांचे आभार मानले.

मौजे कातनेश्वर येथे पवार महाविद्यालयाचा बेटी बचाव बेटी पढाव उपक्रम संपन्न

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणीः मौजे कातनेश्वर येथे स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाच्या स्थानिकांसाठी लाभदाय उपक्रमांतर्गत बेटी बचाव बेटी पढाव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम कातनेश्वर येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे उपसरपंच रामेश्वर चापके तर मार्गदर्शक जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सतीश पाटील हे होते .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपक्रमाचे संयोजक प्रा. जगन्नाथ टोंपे यांनी मांडले.

या प्रसंगी मंचावर गावातील प्रतिष्ठित नागरिक तंटामुक्तीचे अध्यक्ष बापूराव चापके ,पोलीस पाटील ज्ञानोबा काटकर, शालेय समितीचे अध्यक्ष तुकाराम चापके ,आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे मुलीचे शिक्षण ,आरोग्य व संरक्षण यावर मान्यवरांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले . या कार्यक्रमासाठी गावातील महिला, गावकरी , शाळेतील शिक्षक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक राजेश्वर पांचाळ यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे रामेश्वर भाले यांनी मानले .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावकरी मंडळ ,शाळेतील शिक्षक, महाविद्यालयातील संयोजक प्रा. जगन्नाथ टोम्पे, रामेश्वर भाले आदी मान्यवरांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

पालकांनो! लहान मुलांच्या समोर आपल्या चुका टाळा ; मानसिकतेवर होतो परिणाम

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : प्रत्येक आई वडील आपल्या पाल्याला योग्य संस्कार देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो. पण कधी कधी नकळत घडलेल्या चुका लहान मुलांच्या मानसिकतेवर परिणाम करतात. त्यांना त्या चुका पाहण्याची सवय लागली तर त्या चुका ते स्वतः करू लागतात. 'जे ते पाहणार तसे ते शिकणार' अशी शक्यतो लहान मुलांची मानसिकता असते.

यामुळे त्या चुका आपल्याला चुका वाटत असल्या तरी आपल्या चुकीच्या कृत्यांमुळेच ते लहान जीव हे कृत्य करू लागतं. त्यामुळे लहान मुलांसमोर योग्य पद्धतीने वागणे गरजेचे असते. आपल्या कृत्यांचा त्यांच्या इवल्याशा मनावर काही वाईट परिणाम होत नाही ना? यावर लक्ष असणे गरजेचे असते. चला तर मग जाणून घेऊयात, आपल्या मुलांच्या मानसिकतेवर परिणाम करणाऱ्या कोणत्या चुका आपल्याकडून नकळत घडतात?लहान मुलांसमोर खोटं बोलणे अगदोर टाळा. आपण नेहमी आपल्या पाल्यांना सांगत असतो की 'बाळ, खोटं बोलणे चुकीचे असते.' पण आपण स्वतः खोटे बोलणे काही कमी करत नाही. निदान तुमच्या मुलांसमोर तरी नेहमी खरे बोला. लहान मुलांसमोर कधीच कोणत्याही प्रकारचा नशा करणे टाळा. त्यांच्या समोर धूम्रपान नका करत जाऊ तसेच मद्यपानही टाळा. नजरेसमोर असे घडल्याने लहान मुले तशी कृती करू लागतात. नक्कल करू लागतात. लहान मुलांसमोर शिव्याही देऊ नका. अपशब्दांचा उच्चार टाळा. काही लहान मुले तर मोठ्यांचं ऐकून शिव्याही शिकू लागतात.

लहान मुलांसमोर कुणाला कधी वाईट-साईट बोलू नका. कधी कुणाला शिव्या-शाप देऊ नका. याचा परिणाम लहान मुलांच्या बुद्धिमत्तेवर होतो. ते ही तसेच वागू लागतात. शुल्लक कारणाने झालेल्या वादाला समोरच्याला शिव्या शाप देऊ लागतात. भांडण होणे सामान्य आहे पण अशामध्ये आपल्या पाल्याच्या उपस्थितीत स्वतःला कंट्रोल करत चला. याने त्यांना ही काही तरी शिकण्यास मिळेल. शेवटी आपला पाल्य ही आपली सावली आहे आणि आपण तिला योग्य तो आकार दिला पाहिजे.

- डॉ. अनिता सातव,
सचिव, वाघोली डॉक्टर्स असोसिएशन.

ए .पी.आय .सचिन कांडगे साहेब यांनी रहिमतपूर च्या ऐतिहासिक ईदगाह मध्ये जमा झालेल्या मुस्लिम समाजाला दिल्या ईदच्या शुभेच्छा



कोरेगाव ■ मेहमुद्दीन शेख

कोरेगाव : रहिमतपूर पोलिस स्टेशन चे .सचिन कांडगे साहेब हे ईदगाह मध्ये आले असताना आपले विचार मांडताना म्हणाले ये ईद तो दुसरो पे रहम करने को सिखाता है गरिबाला मदत हाच खरा धर्म आहे कोणतीही अडचण आल्यास पोलीस स्टेशनची संपर्क साधावा आपल्या सेवेसाठी आम्ही सदैव तयार आहोत लोकांना फुले देऊन त्यांच्या आनंदात खारीचा वाटा उचलला मुस्लिम समाजातफे त्यांचे आभार मानले गेले तसेच त्यांच्याबरोबर रहिमतपूर चे शिवसेना नेते व नियोजन समितीचे सदस्य व माजी नगराध्यक्ष वासुदेव माने उर्फ काका व त्यांचे सहकारी व अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे सदस्य दरवर्षीप्रमाणे शुभेच्छा देण्यासाठी हजर होते आदरणीय काका म्हणाले रहिमतपूरच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तयार राहणार रहिमतपूर हे गाव हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आहे यावेळी मुफ्ती अजीम यांनी देशाच्या एकता व अखंडता अबाधित रहावी यासाठी दुवा केली नमाज पटनासाठी हजारोच्या संख्येने लोक उपस्थित होते संपूर्ण शहरात पोलीस स्टेशन तर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता सर्व हिंदू मुस्लिम बांधवांनी शीरखुर्मा चा आस्वाद घेतला बंधू भावाप्रमाणे एक दुसऱ्याला आलिंगन दिले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242